सालेअखेर ...
किरकोळ अंकास........................०४

नोटिशीबद्दल.
१० ओळीचे आंत रु० १
पुढें दर ओळीस ०।०६
दुसरे खेपेस........०।

Advertisements.
Below 10 lines...2Rs
Per line over 10..4as
Repetition perline3a

# वऱ्हाडसमाचार.

THE BERAR SAMACHAR.

VOLXXII AKOLA MONDAY 1 OCTOBER 1888 NO39

वर्ष २२ अकोला सोमवार तारीख १ माहे आक्टोबर सन १८८८ इ० अंक ३९

## पत्रव्यवहार.

ह्या सदरा खालील मजकूर पत्रकर्त्याच्या मतास मिळून असतील असें समजूं नये.

अकोट ता० २६-९-८८

रा० रा० वऱ्हाडसमाचारकर्ते यांसः—

कृ० सा० नमस्कार वि० वि० मागील पत्र लिहिल्यापासून पावसानें तर इकडे ढुंकून ही पाहिलें नाहीं व त्याची आतां फारच जरूरी आहे. मे महिन्याप्रमाणें दिवसा कडकडीत ऊन पडतें व रात्रीं स्वच्छ चांदणें पडतें. उष्णता इतकी होते कीं ती सहन करिता येत नाहीं. पिकें अद्याप बरीं आहेत.

मागील पत्रीं लिहिल्याप्रमाणें येथील ताबुताचे व गणपतीचे समारंभ गेले बुधवारी निर्विघ्नपणें शेवटास गेले. तंटा बखेडा बाहेर गावांप्रमाणें मुळींच झाला नाहीं. ताबुताची निरवणूक सुमारें दिवसाचे बारा वाजल्यापासून निघाली होती. लोकांची गर्दी ही बरीच झाली होती. रात्रीचे आठवाजण्याचे आंत ताबुत थंडे करून लोकांनीं आपआपले घरीं गेले पाहिजे अशी मे० तहशीलदार साहेबांची सक्त ताकीद होती. त्याप्रमाणें लोक करतात अगर नाहीं हें पाहण्याकरितां दुपारचे बारावाजल्यापासून तों रात्रीचे नऊवाजेपावेतों मे० तहशीलदार साहेबाची स्वारी दोन्ही आनररी माजिस्ट्रेट सुद्धा बबवार वेशीवर बसली होती. सर्व लोक परत गेल्यावर गणपतीची निरवणूक काढण्याचा हुकूम झाला त्याप्रमाणें गणपतीची निरवणूक सर्व रात्रभर चालू होता. पोलीसचा बंदोबस्त उत्तम होता.

फारेस्ट खात्या संबंधानें नेहमीं लोकांना मोठमोठ्या बाजारचे गावां पावेतो लाकडें वगैरे माल जंगलांतून आणण्यास फार अडचण पडते ती दुर करण्याचे-उद्देशानें सरकारांतून येथून एक मोठी व पक्की सडक मेळघाट पावेतो करण्याचें काम जारीनें चालू आहे. एकाच सडके पासून लोकांना कितपत उपयोग होईल तो होवो परंतु सध्यां तिचा उपयोग फारेस्ट खात्यांतील अंमलदार्यांस फिरण्यास व साहेब लोकांस शिकारीस जाण्यास फार होईल यांत संशय नाहीं या कामाकडे सुमारें दाहा लाखांचा चुराडा होणार आहे असें ऐकितों त्याप्रमाणें इकडून एक ट्रामवे हो सरकार काढणार अशी वदंता आहे. या मेलघाट सडकेच्या संबंधानें हा विभाग ही निराळाच केलेला आहे व त्याकरितां बऱ्याच लोकांच्या नेमणुकाही झाल्या आहेत. सदरहु विभागाचे मुख्य आफिसर इलिचपुरास आहे परंतु त्यापैकीं सडकेचेच कामाकरितां म्हणून तीनच्यार ओव्हर सियरांची ठाणीं सुमारें वर्ष दोन वर्षांपासून येथेंच आहेत. व त्यांचे नोहोस आणखी लोकल फंड कडील एक व पब्लिक वर्कस मधील एक असे दोन ओव्हरसियर येथें आपआपले कामाकरितां येऊन राहिले आहेतच.

या गांवांत गलिछता फार आहे व ती नाहींशी करण्यास कांहीं तरी तजविजी केल्या पाहिजेत या हेतूनेंच बहुतकरून पहिल्यानें या गांवचा नकाशा तयार करण्याकरितां गावचे मोजणीचें काम सुमारें गेल्या दोन माही न्यापासून मोठ्या झपाट्यानें चालू आहे. त्याकरितां मुद्दाम लोकल फंडकडील ओव्हरसियर यांची नेमणूक केली आहे. पहावें पुढें या कामांत कायकाय युक्त्या व कल्पना निघतात. त्या कदाचित् ही इंडिया सरकारच्या नवीन ठरावाप्रमाणें "स्यानिटरी सर्व्हे" तर नसेलना?

पूर्वीं येथ व जळगांवास निरनिराळीं दिवाणी कोर्टें होतीं व त्यामुळें लोकांना फारच सोय होती. कारण लोकांना आपआपले गांवाहून फार झालें तर सात आठ कोसावेवर जावें लागत नसे पण तेल्हाऱ्यास कोर्ट गेल्या पासून तर १५।१६ कोसावरूनही तेथील दिवाणी कोर्टाचें दर्शन घेण्यास जावें लागतें. असें केल्या पासून सरकारला तर कांहीं फायदा झाला नाहींच परंतु लोकांची मात्र गैर सोय झाली. उन्हाळ्यांत व हिवाळ्यांत कसें तरी लोक तेल्हाऱ्यास जातात परंतु ह्या पावसाळ्या दिवसांत तर कांहीं विचारू नका कारण तेल्हाऱ्यास जाण्यास कोणच ही बाजूनें पक्की सडक म्हणून नाहीं व ह्या वेळेस गांवठी रस्त्यांची व नदी नाल्यांची काय स्थिती असते हें सांगावयास नको. एवढ्या कारणा करितां ते कोर्टांत जाणें नको असें होतें. यामुळें आतां कोर्टांत काम मुळीच नाहीं असें ऐकतों. सरकारानीं इकडे लक्ष पुरवून एथून तेल्हाऱ्या पावेतो, जळगावाहून तेल्हाऱ्या पावेतों व शेगांवाहून, आंदुऱ्याहून तेल्हाऱ्या पावेतों पक्क्या सडका तयार लवकर करण्याची तजवीज करावी अशी सूचना आहे. गतवर्षीं लो. कलकट्टांनून आकोट पासून तेल्हाऱ्या पावेतों व तेल्हाऱ्या पासून आंदुऱ्या पावेतों मे. तहशीलदार साहेब यांच्या मार्फत मार्ग दर्शक कच्च्या वाटा तयार झाल्या आहेत त्याचा उपयोग उन्हाळ्यांत व हिवाळ्यांत मात्र होईल. पावसाळ्यांत मुळींच होण्याचा संभव नाहीं.

यंदा वऱ्हाडांत चोहींकडे 'राष्ट्रीय सभा' 'न्याशनल कांग्रेस' ह्या शद्बांचा जसा कांहीं घोष चालला आहे जिकडे तिकडे व्याख्यानें सुरू असून लोकांस माहिती देण्याचें काम झपाट्यानें सुरू आहे आल्हा व देस यंदा भरणाऱ्या चौथे राष्ट्रीय सभेचा दिवस जवळ एऊन ठेपला म्हणून हल्लीं तालुक्याचे सभे करितां मुखत्यार निवडून देण्याचे कामांत लहान मोठे खेडे गांवांतील लोकांची गडबड उडून राहिली आहे. या कामा करितां या तालुक्यांत मुंडगांव येथील देशमुख रा० रा० मुकुंदरावजीनीं जशी काय दीक्षाच घेतली आहे. त्यांनी गांवोगांव फिरून लोकांस माहिती करून देण्याची व त्यांची समजूत घालून देण्याची खटपट ज्यारीनें चालविली आहे हे त्या देशमुखांस मोठें भूषण आहे. यांचें अनुकरण दुसऱ्यांनीं करण्या सारखें आहे पुढाल रविवारी तालुक्याचे सभे करितां खेड्यानी हाय लोकांनीं निवडून दिलेल्या मुखत्यारांची सभा येथें भरणार आहे. त्या वेळेस जिल्ह्याचे सभे करितां या तालुक्याचें तर्फे पाठविण्या करितां मुखत्यार निवडण्याचें काम होणार आहे. त्या सभेची हकीकत पुढील पत्रीं कळवीन. कळावें लोभ असावा ही विनंती.

आपला.

एक "क्ष"

---

वि० वि० गेल्या तारिख १३ सप्टेंबरच्या शुद्धवऱ्हाडी वर्तमान पत्रांतील पत्रव्यवहार ह्या सदरा खालील 'सध्यांचा शिक्षणक्रम' ह्यावरील निबंध वांचला. निबंध कारांनीं, महाकवी भवभूती ह्याच्या श्लोकाच्या चरणद्वयाच्या आधारें आपल्याला सर्व प्रकारच्या बंधनामधून अगोदरच मुक्त करून ठेविलें आहे; कारण ते म्हणतात 'जे कोणी आमची अवहेलना करून ती लोकांत पसरवितात, त्यांनीं असें समजावें कीं हा माझा परिश्रम त्यांज करितां मुळींच नव्हे'; असें म्हणणें भवभूतीला त्याकाळाच्या मानानें भागपडलें होतें, कारण कोणचाहि ग्रंथ काव्य, नाटक, अगर कादंबरी,— लोकांनां आवडणें म्हणजे म्हणजे 'भिन्नरुचिर्हिलोकः' या न्यायानें ज्याच्या त्याच्या पंसतीवर अवलंबून असतें. तसें कोणच्या ही गोष्टीचें सत्यत्व अवड नावडीवर मुळींच अवलंबून नसतां तें केवळ सत्य म्हणूनच कबूल करावें लागतें; आणि म्हणून 'सध्याच्या शिक्षण क्रम' ह्यांतील खरे खरे गुण दोष जर निबंध कारांनीं बाहेर काढले तर प्रत्येक व्यक्तीस काय पण सर्व देशाला ते कबूल करावे लागतील व त्या योगें निबंध काराची अवहेलना होण्याचा कोणच्याही प्रकारें संबंध येत नाहीं. आणि जर निबंधकार प्राज्जल बुद्धीनें त्यांतील गुण दोष काढू इच्छितात तर 'निसर्गिको सुरभिणः कुसुमस्य सिद्धा॥ मूर्ध्नि स्थितीर्नयर णैरव ताडनानी' ह्या न्यायानें सत्यत्व मान्य होईलच तेव्हां 'येनाम केचिदिह' इ० निबंध कारांचे म्हणणें अप्रासंगिक आहे असें म्हटल्या वांचून रहावत नाहीं; आणि जर हें अप्रासंगीक आहे, तर अर्थांत निबंधकार कोणच्य ही प्रकारें बंध मुक्त आहेत असें होत नाहीं. असो; त्या प्रमाणें निबंध काराच्या दुर्गाचा तट पाडून आम्हीं आंत प्रवेश करण्याचें धाडस करितों. प्रथमतः प्रस्ताव क्रमानें ते लिहितात कीं 'विद्येपासून आमचे नफे व्हावयाचे ते ताटे होतात, तेव्हां अर्थांत आमच्या शिक्षण क्रमांत नाहीं तरी दोष असावेत' खरेंच! विद्येपासून तोटे होतात!! आज पर्यंत कोठेंच ऐकण्यांत नाहीं. महान महान विद्वान कविश्रेष्ठांनीं स्वानुभवा वरून 'विद्यानाम नरस्य रुप मधिकं'—तसेंच हर्तुर्याति न गोचरं'— इ० लिहून ठेविलें त्याला हरताळ लावणें भाग पडतें. बरें आमचे निबंधकार अर्वाचीन विद्याविभूषित मंडळींना' जे दोष लावतात ते त्यांच्यात आहेत असें जर गृहीत घेतले तर निबंध कारांच्या मतें राष्ट्रीय सभा (National congrace) म्हणजे केवळ निरर्थक सोंग आहे असें होतें कारण त्यांच्या मतें सध्यांच्या विद्वानांत 'दृढ निश्चय' अगर 'परोपकारबुद्धी' ही मुळींच नाहीं. आणि खरोखरच 'आर्यमातेची सेवा करण्याची' जर त्यांना इच्छा नसती तर त्यांना देशांतील अस्वातंत्र्य, अन्यायानें बसविलेले कर, तसेंच पार्लमेंटमध्यें सभासद होण्याचा प्रतिबंध वगैरे महत्वाच्या गोष्टींच्या विरुद्ध भांडून व यथाशक्ती परिश्रम करून त्या दूर करण्याचे खटपटींत ते कधीं ही पडले नसते. आतां सर्वांचे स्वभाव अगर वृती सारख्या असतात असें नाहीं. तसेंच सर्वांची बुद्धीमत्ता व संपत्ती ह्याही सारख्या असूं शकत नाहींत. कित्येक प्रसंगी केवळ स्वाहित बुद्धीनें अगर अशाच कांहीं अडचणीच्या प्रसंगाच्या अनुरोधानें, जाणून बुजून एखादी अयोग्य गोष्ट करावी लागते. ह्या मानानें म्हटलें म्हणजे निबंधकारांच्या म्हणण्याप्रमाणें मंडळी निघतील, पण ती कितीं! फारच थोडी.

आतां दुसऱ्या गोष्टीकडे लक्ष्य देऊं, ते म्हणतात, उत्पत्ती 'स्वधर्मांच्या संबंधानें जी अनास्था दिसते तिची तरी उत्पत्ती काय? हा विषय वादग्रस्त असल्या कारणानें निबंध कारांच्या पुढील लेखावर अवलंबून आहे. या नंतर शेवटीं ते असें लिहितात कीं 'युरोपांत विद्यादेवीनें आपल्या भक्तांवर अमृत वर्षाव करावा व आमच्याकडे रुष्ट होऊन वारुणी बाईची कांचपात्रें फेकावीं' ह्या वरील वाक्यांतील प्रथम पदाचा उघड उघड अर्थ असा दिसतो कीं युरोपांतील विद्याविभुषित लोक वारुणी संसर्ग विरहित आहेत. परंतु निबंधकार या जगांत डोळे मिटून चालतात असें म्हणण्याला कांहीं प्रत्यवाय येईलसें वाटत नाहीं; कारण आपल्या ह्या लाहानशा भरतखंडांतच वारुणी पानमत्त झालेले युरोपियन लोक गटारांतून महा तीर्थाचीं स्नानें करतांनां थोडे कां दिसतात? आतां निबंधकारांच्या म्हणण्याप्रमाणें अविद्वान ठरतात. परंतु मद्यपान करणारे सर्वच गृहस्थ अविद्वान होऊं शकतील तर हिंदुस्थानांत विद्वान म्हणून एकही युरोपियन येत नाहीं असें म्हणणें भाग पडतें. पण अशी गोष्ट मुळींच नाहीं. ही फक्त हिंदुस्थानची स्थिती झाली, तर सर्व युरोपचा जर विचार केला तर सहजच वाटते कीं या बाईची सेवा करणारे लोक तिकडे पुष्कळ [illegible]तील. [illegible] इच्या पायीं युरो[illegible] ०००० रु [illegible] पयांचा [illegible] आहे.

क्यांतील उत्तरपद कितपत सार्थ आहे तें पाहूं. हिंदुस्थानांतील पंचवीस कोटी प्रजेपैकीं फार थोड्यांना विद्यामृत मिळालें आहे. व निबंधकाराच्या ह्मणण्याप्रमाणें ते सर्वच जर मद्यप्राशनांत मग्न होऊन राहते तर हिंदुस्थानाचे मवील काळापेक्षां चांगली स्थिति पहाण्याचें कधींच नशींबी आलें नसतें. परंतु तेव्हां पेक्षां हिंदुस्थानची स्थिती सुधारली आहे, हे निर्विवाद आहे ह्याला हीं 'उत्सर्गांःसापवादाः' ह्या नियमानें थोडेसे अपवाद सांपडतील आतां निबधकारांच्या ह्मणण्याप्रमाणें सर्व अज्ञ लोक ह्या आरोपापासून सुटु पाहतात, परतु त्यांनीं जर आपल्या उंच बैठकींत बसून थंडगार हवेच्या भरांत असें कांहीं तरी बडबडण्याचे टाकून जरा खालीं उतरून गांवच्या पूर्वेस व पश्चिमेस जी मोठीं दोन घरें आहेत तिकडे अवलोकन केलें असतें तर त्यांनीं असें लिहिण्याचें धाडस केलें नसतें.

एक वाचणारा

पंजाब नादारी मुकद्दमा नंबर ३४
सन १८८८
नमुना ( जी )
विद्यमान नादारि कोर्टाचे जज्ज
जिल्हा आकोला

सर्वत्रांस कळविण्यासाठीं प्रसिद्ध केलें जातें कीं लक्षमण विश्वंभर पाठक राहणार हिवरखेड ता० अकोट जि० आकोला हा नादार आहे असा आज तारखेस ठराव झाला आहे आणि तारिख ११ माहे अक्टोबरसन १८८८ हा दिवस नादाराच्या सावकारांनीं नेमण्याकरितां आणि सावकारांनीं आपल्या तर्फे असामी नेमून देण्याकरितां व नादारानें आपल्या सुटके विषयीं दिलेल्या अर्जाचा विचार करण्याकरिता नेमिला आहे.

नादाराच्या सुटके संबंधीं ज्या सावकारांची तक्रार सांगण्याची इच्छा असेल त्या सर्वांनीं याबद्दल आठ आण्याचे स्टांप कागदावर अर्ज लिहून त्या अर्जानें नोटीस द्यावी. त्या नोटीशींत ज्या आधारावरून तक्रार सांगणें असेल, ते आधार आणि त्याजबद्दल ज्या साक्षीस समन्स करावयाची इच्छा असेल त्या साक्षीदारांची नांवें दाखल करावी ही नोटीस नेमण्याकरितां नेमलेल्या तारखेच्या निदान तीन दिवसापूर्वीं तरी दाखल केली पाहिजे.

कोर्टांत सावकारांनीं पाहण्याकरितां नादारानें दाखल केलेल्या यादी उघड रीतीनें ठेविल्या आहेत ज्यास नादारावर दावे नोंदाविणें असतील त्यांनीं ८८ आण्यांचे स्टांप कागदावर अर्ज करून त्यांत दाव्याची हकीकत लिहून द्यावी. व ते दावे खरे असले बद्दलचा प्रतिज्ञा लेख लिहून त्यावर अर्जदारानें आपली सही केली पाहिजे.

जे सावकार दूरचे रहाणोर असतील त्यांनीं आठ आण्यांचे स्टांपावर दाव्याची हकीकत लिहून एखाद्या जुडिशियल आफिसरापुढें तिच्या खरेपणाविषयीं शपथ लिहावी आणि ती यादी टपालांतून कोर्टास पाठवावी ह्मणजे ते दावे रजिस्टरीं दाखल होतील. कळावें तारीख २९-९-८८ इ०

४३६ गुलाबचंद ब्याहारीलाल मालक गुलाबचंद मोतीलाल दु० हिवरखेड
१६१ केवलराम चतुरभुज मालक चतुरभुजलालजी दु० हिवरखेड.
१५० शिवचंद गन्नूसिंग जमादार वस्ती हिवरखेड

S. Khaparde.
जडज्.

पंजाब नादारि मुकद्दमा नंबर ३५
सन १८८८
नमुना ( जी. )
विद्यमान नादारी कोर्टाचे जज्ज.
जिल्हे अकोलें.

सर्वत्र लोकांस नोटीस देण्यांत येतें कीं, कोंडो विठल जोशी वस्ती वडाळी ता. अकोट हा नादार आहे असा आज तारीखेस ठराव झाला आहे. आणि तारीख ११ माहे अक्टोबर सन १८८८ हा दिवस नादाराच्या सावकारांनीं नेमण्या करितां आणि सावकारांनीं आपल्या तर्फे असामी नेमून देण्याकरितां व नादारानें आपल्या सुटके विषयीं दिलेल्या अर्जाचा विचार करण्याकरितां नेमिला आहे.

नादाराच्या सुटके संबंधीं ज्या सावकारांची तक्रार सांगण्याची इच्छा असेल त्या सर्वांनीं याबद्दल आठ आण्यांचे स्टांप कागदावर अर्ज लिहून त्या अर्जानें नोटीस द्यावी. त्या नोटीशींत ज्या आधारावरून तक्रार सांगणें असेल, ते आधार आणि त्याबद्दल ज्या साक्षीस समन्स करावयाची इच्छा असेल त्या साक्षीदारांचीं नांवें दाखल करावीं. ही नोटीस नेमण्याकरितां नेमलेल्या तारखेच्या निदान तीन दिवसा पूर्वीं तरी दाखल केली पाहिजे.

कोर्टांत सावकारांनीं पहाण्याकरितां नादारानें दाखल केलेल्या याद्या उघड रितीनें ठेविल्या आहेत. ज्या नादारावर दावे नोंदविणें असतील त्यांनीं ८८ आण्यांचे स्टांप कागदावर अर्ज करून त्यांत दाव्यांची हकीकत लिहून द्यावी. व ते दावे खरे असले बद्दलचा प्रतिज्ञा लख लिहून त्याजवर अर्जदारानें आपली सही केली पाहिजे.

जे सावकार दूरचे रहाणारे असतील त्यांनीं आठ आण्यांचे स्टांपावर दाव्याची हकीकत लिहून एखाद्या जुडिशियल आफिसरापुढें तिच्या खरेपणाविषयीं शपथ लिहावी आणि ती यादी टपालांतून कोर्टास पाठवावी ह्मणजे ते दावे रजिश्रीं दाखल होतील.

४०० सिवराम वलद रघुजी वस्ती कालगव्हाण ता० दर्यापूर
१०० बुलीदान सिताराम वस्ती वडाळी तालुके अकोट
३०० विश्वनाथ जोत दुकान सावरे तालुके अकोट
१५० पुंजाजी वलद वनसिंग वस्ती नवरी तालुके दर्यापूर
९० सदाराम फत्तेलाल बहिवाटदार चुनीलाल वस्ती वडाळी तालुके अकोट

G. S. Khaparde,
जड्ज्य

वऱ्हाडसमाचार.

मिती भाद्रपद वद्य ११ शके १८१०.

स्वदेश हितासाठीं तनमनधन खर्चीं घालून रात्रंदिवस झटणारे शेट दादाभाई नवरोजी व मि. बनारजी हे हिंदुस्थानची खरी स्थिती इंग्लिश लोकांच्या नजरे समोर आणून त्यांचें मन वळविण्याकरितां इंग्लंडांत प्रयत्न करीत आहेत. त्यांच्या प्रयत्नास चांगलें यश येत चाललें आहे हें कळविण्यास आह्मास मोठा आनंद होतो. या सद्गृहस्थांच्या देखरेखे खालीं तेथें "इंडियन पोलीटिकल एजन्सी" नांवाची एक सभा स्थापन केली आहे व त्या सभेला हळूहळूं हिंदुस्थानचे खरे हितैषी इंग्रज गृहस्थ येऊन मिळत आहेत. ब्राइट, हंटर यांसारखे हिंदुस्थानचे जुने मित्र आपली मदत तर देतच आहेत परंतु ज्यांची नांवें आपण आजपर्यंत ऐकिली नाहींत असे ही पुष्कळ गृहस्थ आपले मित्र होऊं इच्छीत आहेत. गेल्या महिन्याच्या २१ व्या तारखेस नॉरथ्यांमटन येथें एक बडी सभा भरली होती. त्यावेळीं प्रसिद्ध मि० ब्रॅडलॉ यांनीं आपल्या अलौकिक वाक्चातुर्यानें जमलेल्या लोकांचीं मनें हिंदुस्थानच्या लोकांस मदत करण्याकडे वळविली. या सभेंत आपले देशबंधु शेट दादाभाई व बनारजी यांनी ही उत्तम भाषणें केलीं व हिंदुस्थानची सध्यांची दीनावस्था, आपली गरीबी, व आपल्या वर चालु असलेल्या कायद्यांतील दोष वगैरे गोष्टींचीं चित्रें श्रोत्यांच्या समोर हुबेहुब काढून दाखविली. मि. ब्रॅडलॉ यांनीं तर आपल्या भाषणांत हिंदुस्थान विषयीं पूर्ण कळवळा दाखविला व ज्या ज्या वेळीं प्रसंग येईल त्या त्या वेळीं पार्लमेंट मध्यें हिंदुस्थान संबंधी गोष्टी पुढें आणण्याचे अभीवचन दिलें. एकंदरींत मि. ब्रॅडला यांच्या भाषणा वरून मि. ब्रॅाईट सारखे ते आपले हितैषी मीत्रच झाले आहेत असें म्हणण्यास हरकत नाही.

नारथॅमटन प्रमाणेंच ठिकाठिकाणीं अशा सभा होउन इंग्लिश लोकांच्या मनांत त्यांच्या देशांतच आपल्या विषयीं कळवळा उत्पन्न केला पाहिजे. आपण हिंदुस्थानांत कितीही चळवळ केली तरी ती पासून कांहीं उपयोग होणार नाहीं. आपल्या देशांत काय चाललें आहे हें समजण्यास साधनें जोपर्यंत इंग्लिशमन, पायोनियर यांसारखीं ॲंग्लो इंडियन पत्रेंच आहेत तोंपर्यंत आपल्या चळवळीस कांहीं यश यावयाचें नाहीं. शिवाय दुसरी एक गोष्ट आपल्या लोकांनीं ध्यानांत ठेविली पाहिजे. नारथॅमटन येथें जय मिळाला तेवढ्यावरच आपण स्वस्थ बसतां कामा नये. आपला उद्योग असाच सतत चालविला पाहिजे. नुसतीं गोड गोड संभाषणें व टाळ्यांचा गजर यांनीं पुष्कळवेळां आपल्यास फसविलें आहे.

आजपर्यंत गोवध प्रतिबंधासाठीं भांडणाऱ्या लोकांवर धर्म वेडेपणाचा आरोप ठेऊन त्यांच्या प्रार्थने कडे कोणी लक्ष देत नसें परंतु अलीकडे याविषयाला बरेच महत्व येऊन धर्मा शिवाय दुसऱ्या अनेक गोष्टींचा याविषयाशीं संबंध आहे असें लोकांच्या मनांत भरत चाललें आहे. अर्थ शास्त्र दृष्टया गोवधानें हिंदुस्थानचें किती अनहित होत आहे हें आतां लोकांस कळूं लागलें आहे. हिंदुस्थान देशांत मुख्य धंदा शेतीचा व शेतीला या गोवधा पासून किती धक्का पोंचत आहे वगैरे गोष्टीची चर्चा आतां जागोजाग वर्तमानपत्रांतून व सभांतून होत आहे. बंगाल, नागपुर, मद्रास वगैरे ठिकाणी तर गौरक्षणीं सभा स्थापन होउन त्या गोवध बंद करण्या विषयीं सरकाराजवळ दाद नेण्याचा प्रयत्न करित आहेत. गौमांस हें हिंदेतर जातीं पैकीं पुष्कळांस अन्नाच्या उपयोगीं पडत आहे. युरोपियन सैन्यांत मुसलमानांत त्या वाचुन चालत नाहीं असें असल्या मुळें आजच सरकार हो विनंती जरी मान्य करील च असें खात्रीनें म्हणतां येत नाहीं तरी गौरक्षण करणाऱ्या गृहस्थांनीं आपला उद्योग अन्य रितीनें चालविला पाहोजे. सरकाराकडे दाद नेण्या अगोदर गोविक्रय व गोवध करणाऱ्या लोकांचीच मनें वळविण्यांचा व त्यांस मोबदला देण्याचा यत्न केला असतां गोवध पुष्कळ कमी होण्याचा संभव आहे या विषयाकडे आमच्या वऱ्हाडवासी मनांचें लक्ष अद्याप गेलें नाहीं. ठिकच आहे. सर्वांच्या मागून आम्हीं जागे होत असतो.

हिंदुस्थान सरकार ठवकरच एक गुप्त कार्य धुरंधरांचे मंडळ आफगाणिस्थानांत अमीराशीं कांहीं उभय राज्यासंबंधीं महत्वाच्या गोष्टींचा विचार करण्या करितां पाठविणार ह्मणुन अलिकडे थोड्याच दिवसापासून वर्तमानपत्रांतून समजत आहे. कांहीं कामांचा विचार करून त्यांत सल्ला घेण्याचो जरूर आहे त्या करितां कांहीं योग्य अधिकार दिलेले ब्रिटिश आफिसर आपण काबुलास पाठवावे अशी अमीरानें विनंति केल्यावरून हें मंडळ आपलें सरकार पाठवीत आहे असें म्हणतात. त्या मंडळाचें मुख्य स्थानीं मि० डयुरंड, हिंदुस्थान सरकारचे फारिन सेक्रेटरी यांचीं नेमणूक झाली आहे. शिवाय दुसरे आणखी कांहीं ब्रिटिश आफिसर आहेत. व्हाइसराय साहेबांचे प्रायव्हेट सेक्रेटरी हे ह्या कमिशन बरोबर लार्ड डफरिन यांचे मित्रत्वाच्या नात्याचे स्वदेशीं जातां वेळेचे खुशालीचे निरोप अमिरास पोंचविण्यांस जाणार. मोठमोठ्या राज्यकार्य धुरंधर मंडळीची योजना झालेली पाहून काम हो महत्वाचेंच असावें अशी कल्पना होते. हें मंडळ काबुलास जाण्या करितां निघण्याची सर्व तयारी झाली असून ते अद्याप जाण्यास निघत नाहींत याचें कारण असें समजतें कीं, अमीराचा चुलत भाऊ इशाकखां यानें बंड केलें आहे व तो फौज घेऊन काबुलाकडे येत आहे. कित्येक ह्मणतात तो फौज घेऊन काबुलाकडे येत नाहीं, पण त्यानें मोठेंसेंच बंड केलें आहे हें मात्र खरें. कित्येक इंग्रजी पत्रावरून असें समजतें कीं, इशाकखां यांचें बंड लवकरच जर मोडलें नाहीं तर हे ड्युरंड मिशन पाठविण्यांत येणार नाहीं असें हिंदुस्थान सरकारानें अमीरास कळविलें आहे. इशाकखां यांच्या बंडाची ही इतकी धास्ती वाटण्याचें कारण असें कीं तो तुर्कस्थानांतील जो आफगाण मुलुख बुखारा आणि रशियन तुर्कस्थान यास लागून आहे तेथील गव्हरनर आहे व त्या मुळें खास आफगाणिस्थानांत प्रवेश होण्यांस जे कांहीं मार्ग आहेत ते याचे स्वाधीन असल्या सारखे आहेत. बुखारा हा प्रांत साधारणपणें रशियाचा ह्मटला तरी चालेल व त्या मुळें तेथें रशियाचीं सारीं कारस्थानें अगदीं निर्बंधपणें बुखाऱ्याच्या अमीराच्या मार्फतीनें चालण्यास कांहीं हरकत

नाहीं, आणि यामुळें असा संशय आहे कीं इशकखां यांस ह्या बंडाचे कामांत बुखाऱ्याच्यां अमिराची उठावणी असून पूर्ण सहाय असावें, आणि अमिरास रशियाचा आश्रय आहे, आणि हे कदाचित् खरेंही असेल. बुखाऱ्याच्या अमिराजवळ रशियाच्या धर्तीवर कवाईत वगैरे शिकून तयार अशी फौज बरीच आहे. हें सारें खरें असल्यास काबुलच्या अमिरास आपला तुर्कस्थानांतला मुलुख लढाई करून परत मिळविणें फारच कठीण, बहुतेक अगदींच अशक्य आहे असें दिसतें. अबदुल रहिमान यांस मोठ्या संकटाच्या स्थितींत पडल्या सारखें झालें असेल, व हिंदुस्थान सरकारास अमिरास ह्या प्रसंगीं काय सला द्यावी म्हणून मोठें गूढ पडलें असेल. अमिरास आपल्या तुर्कस्थानांतील आफगाण मुलुख सोडून देऊन नुकसान सोसून स्वस्थ बसण्यास सांगावें तर ही कमजोरपणाची सल्ला आपण रशियाचे भीति मुळें देतों असें त्यास वाटून आपलें जें त्यास मोठें महत्व वाटत आहे व त्यामुळें जी त्याची आज आपणावर विशेष श्रद्धा आहे ती नाहींशीं होईल; त्यास लढाई करून आपला मुलुख परत घेण्यास सांगणें म्हणजे रशियांशीच लढाई करण्यास सांगण्या सारखें आहे व तसें सांगितलें म्हणजे त्यांस इंग्रज सरकारास मदत द्यावी लागेल. रशियन सरकारशीं लढण्या करितां मदत देणें लहान सहान काम नाहीं, आणि शिवाय अशी रीतीनें युद्ध सुरू झाल्यावर त्या पासून पुढें फार भयंकर परिणाम होण्याची हिंदुस्थानास फार भिती आहे.

अशा प्रसंगीं आमचे हिंदुस्थान सरकार काय करतें तें पहावें. तूर्त तें कांहींच करीत नाहीं. इशकखा याचें बंड मोडून टाकण्याची जलदी करावी, आणि तें मोडल्यावर इतर सर्व गोष्टींचा विचार होईल एवढें फक्त अमीरास कळविलें आहे. तेव्हां अर्थातच इशकखांच्या बंडाचा शवट होईपर्यंत हे ड्युरंड मिशन मागें पडलें.

मुंबईच्या एका प्रत्यैहिक पत्रांवरून समजतें कीं इंग्रजसरकार, अयुबखां हा रावळपिंडी येथें स्वाधीन आहे व तो आफगाणिस्थानांतील गिलझाई व दुसऱ्या कित्येक महत्वाच्या जातीस प्रिय आहे, ह्या गोष्टीचे अबदुल रहिमान यांस चांगलें स्मरण देऊन त्यास नीट जागृत करणार व तेणेंकरून त्यास आपलें राज्यांतील बंड मोडून टाकण्याचे कामीं योग्य श्रम घेण्याची जरूरि किती आहे हें स्पष्ट समजुन सांगणार. आणि त्याबरोबर दुसऱ्या ही कांहीं महत्वाच्या गोष्टी इंग्रज सरकार त्यास सुचविणार आहे.

अमीरानें आपले राज्यांतील बंड मोडल्यानंतर डुरंड मिशन काबुलास जाईल असा अजमास आहे व तेथें जाऊन अमीराशीं पुढें सांगितलेल्या गोष्टीचा विचार होणारः— चमन पासून कंदहारपर्यंत अमिरानें, त्यावर इंग्रज सरकारास सोयकर वाटेल तेव्हां आगगाडीचे रूळ घालतां येतील, असा रस्ता तयार करावा; हेलमंदावर पूल बांधावा व हिरातपर्यंत चांगला रस्ता तयार करावा; हिरात, बल्ख, मैमिना आणि आफगाण सरहद्दीवरील इतर ठिकाणें येथें, त्यांचे आसपास रशियाच्या हालचालीवर नजर ठेवण्याकरितां व त्याची बातमी देण्याकरितां, इंग्लिश एजंट असावेत; अंबझी ब्रिटिश-सरहद्दीपासून धीरपर्यंत आणि तेथून चित्रल पर्यंत रस्ता तयार करण्याचे कामांत अमिराचे एजटांची मदत असावी; लांदीखाना पासून जलालाबाद पर्यंत रेल्वे करणें; हिंदुस्थानाशीं काबुल आणि आफगाणिस्थानांतील मोठमोठी ठिकाणें तारायंत्रानें जोडणें; आफगाणिस्थान व पंजाब यांमधील जुने हल्लीं उपयोगांत नसलेले रस्ते योग्य वाटल्यास खुले करणें; ब्रिटिश सरकारचे हितास आड येणारी अशीं कोणतीही मध्यस्थी सरहद्दी वरील स्वतंत्र लोकांत न करण्याचें व त्यांच्या योगानें आपल्या राज्यास जास्त बळकटी आणण्याची खटपट न करण्याचें कबूल करणें; हिंदुकुशाच्या ओळीवर एक हजार कंटिंजंट फौज असावी व तीजवर ब्रिटिश आफिसर असावे आणि तिचा खर्च हिंदुस्थान सरकारनें द्यावा.

# The Berar Samachar

MONDAY OCTOBER 1, 1888.

## THE PRESENT SYSTEM OF EDUCATION.

(Continued from our last issue).

Then again the standards are very high. We have said our say when the revised standards were published. We have shown by comparing our standards with those in the Bombay Presidency that our standards are higher standard for standard. The variety of subjects is already crushing the mental stuff of the boys; and the greater the amount of study in each subject in a year, the greater the strain.

So far as the system of standards. But there is yet a very important question as to whether the present system is in touch with the requirements of the public. Are you giving such a kind of education as is really wanted by the people? The answer is not at all. For ourselves, we perfectly believe in the *education of the masses* as a panacea for most of our social, moral and political evils. The masses are ignorant and they must be informed. But the only way to get at them is by reading making readers of them; the very first essential of any step towards their improvement is that they must know how to read and write. When they know that, then you could induce them to read small tracts particularly prepared for them and thus try to improve them gradually in the course of a few centuries. From this point of view, the 3 R s as they are called become very important. It is useless for a ploughman to know where Leipzig is or how the spaniards conquered a part of America. We do not mean to say that the present system will not suit anybody; what we say is that changes must be made even in the present system for those that want it; but that elementary education such as the people desire and want should be spread broad cast. Reading and writing Balbodh and Modi character, arithmetic up to the rules of three, and the mode of making up accounts with their debtors and creditors and the principles of sanitation and good health would represent almost the whole of the celementary education of a kunbi ryot. Our schools as at present constituted supply these or some of these, no doubt; but they are mixed up with other subjects which are of no practical utility to ploughmen in their daily vocations. If changes are made on the lines above indicated and the parents of boys are given the option of not learning any one or more subjects, the number of boys might in all probability be increased. For the education would then be quite in keeping with the actual needs of the people.

In the meantime before any change is introduced in the present system, it is worth while for those interested in the education of the masses to try an experiment by the establishment of small schools in places where there are government schools and teach the boys only such subjects as the people really want. We say the schools should be established at places when there *are* government schools already in existence because the contrast in teaching would be evident there and it would be manifest at a stroke if the people really appreciate the new system. If such experiments succeed in about half a dozen places, that would be a fair index to the fact that a change is needed and then there would be some data for moving the government in the matter and asking for a change.

A correspondent from Julgaon sends us the following account of the efforts which our friends at that place are making for the coming National Congress:-

"Following in the wake of their brethren at Malkapur some of the intelligent and educated of our towns men are doing excellent work here for the approaching National Congress. Availing themselves of their holidays they undertook regular preaching excursions throughout the Taluk and went on holding Sabhas at every village, and explaining the objects and work of the Congress to the village people in simple language. Great interest and enthusiasm are exhibited by the latter, so much so that at some places the preachers are actually forced by the villagers to pay a visit to their village and hold a Sabha there. There is not a village left but knows something about the congress and its objects. In short the word "Congress" has become a watch-word with the simple villagers. About 400 Mukhtyars representing upwords of 10000 people have been elected as members of the Taluka committee which will meet at Julgaon on the 7th, Instant, to chose their representatives for the zilla Committee &c. &c."

Well done! friends, that is the way to proceed. The best way to improve mankind is, they say, to begin with the lowest strata of society and if we want to bring about the regeneration of India we must do the same here. Want of earnestness of purpose and concentration of mind are the most prominent drawbacks among our people. If we wish to raise our heads we must in a hearty fashion, put our shoulders to the wheel to force the national wagon from the deep ruts in which it is embedded. Let our educated friends in other parts of the country but set themselves a going as Malkapur and Julgaon are doing this year and as our Madrasee brethren did the last year and India's days of adversity will be numbered soon.

## RESOLUTION.

(Continued from our 17th, issue.)

(4) At present the only kind of drainage suitable for small towns is open surface drainage carried along lanes and streets to some convenient outlet.

All covered drains should be avoided The surfaces of lanes and streets should be graded so as to allow rainwater to pass radily to the surface drain, and the drain should have a shallow watertight seetion.

The material should be the best and cheapest to be obtained on the spot. Cut stone or concrete or asphalte might be used, or masonry or close fitting vitrified brick; but in any case it is absolutely necessary that the channel should itself be laid true, have a sufficient fall, and that all the joints should be watertight. Open cuts in the earth are of no use, but are on the contrary to be avoided, as leading to a damp unwholesome state of the subsoil.

(5) Where lanes or roadways have a considerable fall, the strong currents produced by tropical rains are apt to injure, or even to ruin, the side drains: This may be avoided by constructing the drains with steps, to break the current.

Surfaces of roads and lanes must, as everywhere, be made of the hardest and cheapest material available. The essential points in small town and village road formation are that the gradients should be properly laid out to drain the road to the side gutters, and that the surface should be carefully kept in repair. Little labour would be required for this purpose in comparison with the outlay necessary for reinstating the road after it has been half ruined by rain and traffic.

Shallow saucer-sectioned surface drains can be kept clean by sweeping or by throwing water into them. With due care in cleansing with fresh water there would be no risk in allowing water used by households for washing and bathing to run into the surface drains.

The surface drains should discharge their contents into open impervious shallow surface sewers, by which the water could be conveyed to a distance from the town and used at once for irrigating land, and so be finally disposed of.

All household and town impurities are best made use of by being applied to agricultural purposes, and dungheaps near the town should be avoided.

(6) The general health of small towns may be much improved by removing all useless jungle, by lopping the lower branches of trees so as to improve the external ventilation, and by planting trees on wet or damp ground within or near the town—a measure which dries the ground and purifies the air. Tree planting along the public roads is also beneficial to health.

(7) Another general town improvement of much importance is the removal of all ruinous dwellings and levelling their sites.

(8) Any foul unwholesome surfaces of ground within the town can readily be improved by covering the area with a few inches of clean earth, which is by far the best disinfectant to use.

(To be continued).

## वऱ्हाड.

हवामानः—गेल्या आठवड्यांत किंचित् थोडासा पाऊस आला. पिकें बरीं आहेत. हवेचा उपद्रव आतां नाहीं म्हणण्यास हरकत नाहीं.

हैदराबादच्या रेसिडेन्टच्या जागी सार लेपेल ग्रिफिन न येतां मध्य प्रांताचे सध्यांचे चीफ कमिशनर मि० मेकंझी हे येतील अशी वार्ता आतां आली आहे मे० हावेल साहेबांस ती जागा कायमची मिळाली असती पण ते स्वतःच तेथें राहण्यास नाखूष आहेत असें ह्मणतात.

रा. विश्वनाथ नारायण दांडेकर ए. अ. क. यांस यवतमाळास नेमलें.

रा. रा कृष्णाजी दिनकर सहस्त्र बुद्धे सब इंजिनियर यांस आकोल्याहून खामगांवांस बदललें असें समजतें.

## वर्तमानसार.

— वऱ्हाडांतून ६००००० रुपये निजामखजिन्यांत गेले बाकी ८००००० रु० पाठविण्याची तयारी आहे.

कंदाहार शहराकडे होत असलेले रेल्वेरस्त्यांत खोजाक पहाडांतून एक ६ मैल बोगदी खणीत आहेत. खणणारे सर्व गोरे आहेत.

— कुटुंब खर्चांत काटकसर व घर स्वच्छता या विषयावर ज्यांचें पुस्तक पसंत ठरेल त्यांस १ हजार रुपयांचें इनाम मिळेल अशी हिंदुस्थान सरकारानें जाहिरात दिली आहे. सदरहु पुस्तक शाळा खात्यांतून सुरू करविण्याचा सरकारचा मानस आहे.

— रावळपिंडी येथें सरदार आयुबखान हे राहत आहेत. ते तारीख १८ मिनहू रोजीं एका स्नेह्याचे वरीं बायका मुलासह नाफतीस गेले असतां रात्रौ तेथेंच राहिले. इकडे त्यांच रात्रीं त्यांचा निजण्याचा दिवाणखाना कोसळून खालीं पडला. सरदार अयुबखान घर मंडळी सह तेथें असते तर त्या सर्वांचा तात्काळ चुरा झाला असता. तेथील लोक हें ईश्वरी कौतुक म्हणून समजतात.

— फ्रान्स देशांत यंदा अवर्षण पडल्यामुळें भाकरीसाठी लोक दंगे करूं लागले आहेत. फ्रेंच सरकारानें बाहेर देशांतून येणार धान्यावरील जकात उठविली आहे व त्यामुळें मुंबईहून आतांनात गहुं त्या देशीं गेले महिन्यांत आला असें ता० १८ मिनहुचे तारेवरून समजतें.

कानपुरापासून १० मैलांवर एक खेडें आहे, तेथील राहणारा एक ब्राह्मण मयत झाला. त्याचें प्रेत चितेवर दहन होत असतां त्याचे बायकोनें जाऊन एकदम त्या अग्नींत उडी टाकली, पतिव्रता धर्मात सहगमनाचें पुण्य जोंवर इकडील स्त्रियांच्या अंतःकरणावर ठसलें आहे तोंवर असले प्रकार नजरे पुढें येणारच.

न्या० सिं०

सौंदर्य देवतेची ज्यांच्यावर कृपा नाहीं त्यांनीं विशेष वाटूं देऊं नये. कारण आजपर्यंतच्या इतिहासावरून जगाचा अनुभव जर पाहिला तर असें दृष्टोत्पत्तीस येते कीं, ज्या ज्या ठिकाणीं सौंदर्यदेवतेची हतराजी त्या त्या ठिकाणीं बुद्धिदेवतेची कृपा. आजपर्यंत जगांत जीं कांहीं अचाट, अमानुष कृत्यें झालीं आहेत तीं कुरूप, खुजे अशाच लोकांच्या हातून झालीं आहेत. अकराव्या शतकांत जेरूशलेममधून मुसलमान लोकांस हाकून देण्याकरितां ज्यानें केवळ आपल्यां वाक्चातुर्यानें २०००० लोक एका क्षणांत आपल्या भोंवतीं जमविले तो पीटर धी हरमिट अतिशय कुरूप आणि खुजा असा होता बुद्धतेबिषयीं ज्याची कविता प्रसिद्ध आहे तो पोप कविही ठेंगणा आणि कुरूप असा होता ज्यानें सर्व युरोपखंड पादाक्रांत करण्याचा बेत आणला होता तो नेपोलिअन बोनापार्ट खुजा आणि थापटलेल्या तोंडाचा होता. एथील पंडित गटुलालजींचें सुद्धां उदाहरण या बाबतींत लक्षांत ठेवण्यासारखें आहे.

शीखलोक धुलिपर्शिगाचें प्राबल्य वाढविण्यासाठीं लोकांस उमेद देत असतां अमृतसर पोलिस सु० पोलीस यांनीं कांहीं लोकांस पकडलें आहे. ज्यास्त तपासांत त्यांनीं अशी पण माहिती संपादिली आहे कीं त्या लोकांनीं क्याबलीरमध्यें आपली इछा उघड केली आहे त्या शिवाय आणखी कांहीं पलटणीमध्यें या लोकांनीं विशेष गोष्टी सांगून धुलीपसिंगाचा महिमा वाढविला आहे.

म० मि०

क्रॉफर्ड कमिशनच्या कामास तारीख ८ आक्टोबर पासून पुणें येथें कौन्सिलहालांत सुरुवात होणार व चौकशी ऊघडपणें चालणार आहे.

चमत्कार मौजे रावे येथें एका गाईची कालवड असून तो अद्यापि पोत आहे. असें असतां तिच्या सडांतून दुध सुमारें अर्धी पंचपात्री निघतें, व तें पाहिजे तेव्हां निघतें असें कळतें.

नार्थवेस्ट प्राव्हिन्सेसमधील देशी वर्तमान पत्रांवर पोलिसास नजर ठेवण्याविषयीं सक्त ताकीद झाली आहे. रिपोर्टरचें आफिस पोलीस इन्स्पेक्टरचे ताब्यांत दिलें आहे. इतकें काय बरें होण्याचें कारण?

काबुलच्या अमिरास एकाएकीं देवाज्ञा झाल्याबद्दल ताशकंदहून खबर आली आहे.

गायकवाड, शिंदे, व होळकर यांस समुद्रपर्यटण करणें झाल्यास सन १८६१ सालच्या हुकमा अन्वयें स्वतांच्या सामानाबद्दल बंदरावर कांहीं जकात पडत नसे, परंतु सरकारानें आतां निजाम म्हैसूरचे महाराज यांस आणि ज्यांस १९ तोफांची सलामी मिळते त्या सर्वांस ही माफी सरकारानें दिली.

या आठवड्यापासून विलायती मेल मंगळवारी न जातां शुक्रवारी जात जाईल.

डोळ्यांत खडा गेला असेल तर ज्या डोळ्यांत खडा गेला असेल तो डोळा न चोळतां दुसरा डोळा चोळावा म्हणजे कांहीं वेळानें तो खडा निघतो असें विलायतेतील एका मासिक पुस्तकावरून समजतें. युक्ति फार चांगली आहे.

स्त्रियांना सौंदर्य देणारे डाक्टर— न्युयार्क येथें १ स्त्री डाक्टरचा धंदा करिते. व कुरूप स्त्रियांना सौंदर्य देण्याचे ही एक अजब कसब तिणें संपादण केलें आहे. यामुळें घाटेंगण परंतु बेढब अशा स्त्रिया आपल्या चेहऱ्यावर सौंदर्याची कळा यावी, किंवा आपण दुसऱ्याच्या डोळ्याना कुरूप दिसूं नये, म्हणून उपचार करून घेण्याकरितां या स्त्री डाक्टरणीकडे येत असतात. व अशा रोग्यांची संख्याही तिच्याकडे वाढत चालली आहे, या वैदीण बाईना तिकडे ‘ सौंदर्य वैद्य ’ असें नांव मिळालें आहे, व एखादी कुरूप स्त्री या वैदिणीच्या उपचारामध्यें सहा महिने राहील, व तिच्या हुकमाप्रमाणें पथ्यापाण्याची व्यवस्था ठेवील, तर तिचा पूर्वीचा कुरूप चेहरा बदलून तो मोठा मोहक होतो, असाही तिकडील लोकांना अनुभव आला आहे.

क० त०

रा० हणमंतराव जहागिरदार यांजवर इं. पी. कोड कलम १६२ व १६३ प्रमाणें जो आरोप आला होता त्या आरोपाची शाबीती होऊन हणमंतरावास तारीख २४ रोजीं दुपारीं १२ वाजतां शिक्षा सांगण्यांत आली.

श्रीमंत सयाजीराव महाराज पुढील महिन्याच्या १०व्या तारखेस मुंबईस येणार असें कळतें.

काबूलचे अमीर मेल्याबद्दलची इराणाकडून बातमी आली आहे. परंतु आमचे सरकारास अमीराचें ता० १३चें पत्र आलें, त्यावरून बातमी खरी असेलसें दिसत नाहीं.

भावी व्हाइसराय लार्ड लान्सडौन हे ता० १९ नवेंबर रोजीं ‘गंगा’ आगबोटीतून इकडे यावयास निघणार.

कर्नल मार्शल हे हैद्राबादेस पुनःपरत जाणार अशी बातमी फिरून आली आहे.

विंझच्या दिव्यांनीं लोकांमधील अंधत्व वाढेल अशी पुष्कळांची समजूत आहे.

भोपाळ प्रकरणाचे सर्व कागद व्हैसराय यापुढें गेले आहेत असें म्हणतात. या प्रकरणांत ते नीट तपास करितील, तर त्यांचे तांव निरंतर राहील.

गृहव्यवस्था व स्वच्छता या विषयांवर जो उत्तम पुस्तक लिहील त्यास एक हजार रुपयांचें बक्षीस सरकार देणार आहे.

नवीन एक बंदुक निघाली आहे, तिंत एका मागून एक सोळा बार पुनः भरल्या खेरीज सोडितां येतात.

रशियांत मर्वच्या भोंवतीं पुष्कळ कापूस पिकूं लागला आहे.

मद्रास इलाख्यांत चितळदुर्ग जिल्ह्यामध्यें रुप्याच्या खाणी सांपडल्या आहेत.

तिरव्यांत म्यांगानीज नांवाच्या धातुचा अंश सुमारें २७ भाग घातला असतां त्या मिश्रणावर लोहचुंबकपणाचा जोर चालत नाहीं, असा एक नवीन शोध लागला आहे.

के०

क्राफर्ड प्रकरणाची चौकशी ता० ८ आक्टोबरपासून सुरू होणार म्हणून समजतें.

डेक्कन माइनिंगच्या संबंधानें निजामसरकारचें जें कांहीं नुकसान झालें आहे, तें भरून घेण्याकरितां ते सरकार अबदुल हकच्या विरुद्ध कायदेशीर दावा करणार आहेत.

न्या० सु०

ब्रम्हदेशांत मोकळी जमीन आहे, तेथें वसाहत करण्याची खटपट सुरू आहे. आमचे इकडून कोणी उद्योगी लोक जातील तर मोठा फायदा होईल.

नोटीस.

रा. रा. रामूलाल लक्ष्मीप्रसाद दुकान आकोलें यांसः—

खालीं सही करणार यांजकडून नोटीस देण्यांत येत आहे कीं आम्ही तुमचे सोन्या रुप्याचे दागिने तयार करून दिले त्या केलेल्या कामाचे किमतीबद्दलचा पैसा अद्याप तुमचे कडुन येणें आहे तो तुम्ही दिला नाहीं यास्तव आठदिवसांचे आंत सदरील केलेल्या कामाच्या किमतीबद्दल आकार रुपये ३० तीस आज पासून आठ दिवसांचे आंत या नोटीशीच्या खर्चा सुद्धां आम्हांस द्यावे. न दिल्यास रीतीप्रमाणें कोर्टांत फिर्याद करून खर्चा सुद्धां रुपये घेण्यांत येतील. कळावें तारीख २८ माहे सप्टेंबर सन १८८८ इ०

( सही )
बाळकृष्ण गंगाराम सोनार
राहणार आकोलें.
दस्तुर खुद्द.

## बक्षीस ५० रुपये

नाडीपरीक्षेसंबंधीं उपयुक्त निबंध, खालील पत्त्यावर चालू सालच्या फाल्गुन अखेर ज्यांचे येतील, व त्यात जो पंचानुमतें उत्तम ठरेल, त्यास सदर बक्षीस देण्यांत येईल. ज्यास्त माहितीस टिकीट पाठवावें.

शंकर दाजी शास्त्री पदे.
मुंबई, नवानागपाडा, नंबर १६०

## NOTIFICATION.
## BERAR HORSE AND CATTLE SHOW.

The Resident having sanctioned the proposal to hold a Horse and Cattle show annually in the Province at the same time and place and also the award of rupees 500 as prizes on each occasion and the supply of grass for cattle competing free of charge, it is decided that the show should be held at Amraoti every year in the month of November.

This year the show will commence on 23 rd November 1888 and terminate on 30 th.

Signed. H. C. A. Szczepanski
Commissioner
H. A. D.

## वऱ्हाडांतील घोड्यांचें व गुरांचें प्रदर्शन.

अलिशान रेसिडेन्ट साहेब बहादूर यांनीं वऱ्हाडांत दरसाल एकाच वेळीं व एकाच ठिकाणीं घोड्यांचें व गुरांचें प्रदर्शन भरविण्याचें व ह्या प्रदर्शनांत प्रत्येक वेळीं ५०० रुपये पर्यंत बक्षिसें देण्याचें, व त्याच प्रमाणें प्रदर्शना करितां आणलेले जनावरांस फुकट चारा देण्याचें, मंजूर केल्यावरून असें प्रदर्शन उमरावती येथें प्रतिवर्षीं नोवेंबर महिन्यांत भरविण्याचें ठरलें आहे.

यंदाचें प्रदर्शनास तारीख २३ माहे नोवेंबर सन १८८८ इसवी रोजीं सुरवात होऊन तें तारीख ३० मिनहू रोजीं संपेल.

(Signed) H. C. A. Szczepanski
Commissioner
H. A. D.


## व्यापारोत्तेजक.

आगाऊ वर्गणी कि० ट० सह फकत बारा आणे.

हे पाक्षिकपत्र महिन्याहून दोन वेळा प्रसिद्ध होत असते यांत नवलविशेष, स्वदेश, परदेश, बाजारभाव, नोटीसा जाहिराती आणि सवडीनुसार मनोरंजक चुटके वगैरे विषय छापले जातात. वर्गणी आगाऊ आल्या खेरीज पत्र सुरु केलें जाणार नाहीं. सर्व प्रकारचे पत्रव्यवहार खालील पत्त्यावर. सर्व शहरी एजंट पाहिजे.

व्यापारोत्तेजक कर्ते
भायखळा मुंबई


☞ हें पत्र आकोला येथें के० वा० खंडेराव बाळाजी फडके यांचे “ वऱ्हाडसमाचार ” छापखान्यांत नारायण खंडेराव फडके यांनीं छापून प्रसिद्ध केलें.

किरकोळ अंकास...... ..............०४

नोटीशीबद्दल.
१० ओळीचे आंत रु० १
पुढें दर ओळीस ०।०६
इतर खेपेस........०।

Advertisements
Below 10 lines...2Rs
Per line over 10..4as
Repetition perline3a

# वऱ्हाडसमाचार.

## THE BERAR SAMACHAR.

VOLXXII AKOLA MONDAY 8 OCTOBER 1858 NO40

वर्ष २२ अकोला सोमवार तारीख ८ माहे आक्टोबर सन १८८८ इ० अंक ४०

## जाहिरात

संस्थान सोंडुर जिल्हा बल्लारी इलाखा मद्रास येथें श्रीकार्तिक स्वामीचें महास्थान आहे. तेथें येत्या कार्तिक महिन्यांत शुद्ध पोर्णिमेस आणि वद्य प्रतिपदेस या दोन दिवशी महायात्रा भरणार आहे. तर यात्रेस येऊं इच्छिणाऱ्या मुमुक्षु लोकांच्या सोईकरितां खालीं लिहिल्या प्रमाणें टिकिटांचे दर ठेविले आहे.

| | रुपये. |
|---|---|
| पंचमृताभिषेक | २५ |
| सर्वांगाभिषेक | १५ |
| पादाभिषेक | १० |
| पादस्वर्श | ५ |
| दर्शनाटिकिट | २ |
| बारावर्षांचे आंतील | |
| मुलास दर्शनटिकिट | १ |

कार्तिक शुद्ध १३ पासून तों कार्तिक वद्य १ पावेतों श्रीकार्तिक स्वामीचे डोंगरावर टिकिटें विकत मिळतील. दरवाज्यावर टिकिटें न दाखवितां दांडगाईनें आंत प्रवेश करण्याचा कोणी प्रयत्न केल्यास त्याबद्दल काय देशीर इलाज करण्यांत येईल तारीख १ माहे आक्टोबर सन १८८८ इसवी

सही भीमराव पोळ म्यानेजर श्रीकार्तिकस्वामी
देवस्थान संस्थान
सोंडुर
जिल्हा बल्लारी

## जाहिरात

श्री वेंकटाधीश
स्वामीसंस्थान
पेठ देऊळगांव

श्री व्यंकटेशजी स्वामी संस्थान पेठ देऊळगांव इलाखा तालुके चिखली जिल्हा बुल्डाणे वि० राव जगदेवराजे बाजीगाव जाधवराव पाळणकरणार आजीराणी अहिल्याबाई साहेब जमीदार दौलताबाद वगैरे
यांजकडून

कोलनामा साहु व व्यापारी कासार भिन्यार व हलवाई वगैरे दुकानदार जनसमुह सन १२९८ फसली कोलनामा सादर केला जातो जे मामुलीप्रमाणें आश्वीन मासी विजया दशमी रोज रविवारचा श्रीचा उच्छाह सुरू असून लळीत आश्वीन वद्य ३ रोज मंगळवार आहे करितां सहकुटुंब सहपरिवार दुकानदारीचे माला सहीत येऊन श्रीजींचे दर्शनाचा लाभ घ्यावा पूर्व सांप्रदाय विदित आहेच कोणते प्रकारें तोसीस लागणार नाहीं अगत्यरूप येण्याचें करावें कळावें मित्ती भाद्रपद वद्य ३ शके १८१०

मोर्त वसद

## पत्रव्यवहार.

ह्या सदरा खालील मजकूर पत्रकर्त्याच्या मतास मिळून असतील असें समजूं नये.

मु. पुसद तारीख २८-९-८८

काय चमत्कार आहे पहा कीं आपणांस हल्लींच्या तऱ्हेचें थोडेसें शिक्षण मिळालें म्हणजे आपल्या देशाची सुधारणां करणें हें अवश्य आहे असें आपणांस वाटूं लागतें. सांप्रत स्त्री शिक्षण, विधवांकेश वपन, जाती भेद, राष्ट्रीयसभा, शिल्पकला, पुर्नविवाह, विवाह मर्यादा, वगैरे विषयांत आपल्या पैकीं कित्येकांचीं मनें इतकीं निमग्न झालीं आहेत कीं सुधारणेस आणखी कोण कोणत्या विषयांचें अवलंबन केलें पाहिजे या कडे त्यांचें अगदीं दुर्लक्ष झालें आहे. आपल्या धर्मोन्नतीकडे आपलें लक्ष आहे असें किती लोक निघतील? आतां कित्येक म्हणतात कीं यावेळेस धर्माकडे लक्ष देऊन उपयोग काय! पुढें देऊं. परंतु प्रत्येक गोष्ट करण्याचा कांहीं एक नियमित काल असतो. त्या कालांत जें करण्याचें तें न झालें व पुढें करण्याचें मनांत आल्यास त्यांत वहुधा यश प्राप्ति न होतां तें सर्व आपल्या मनांतल्या मनांतच राहतें खरोखर धर्मसंबंधानें आपली स्थिति शोचनीय आहे. अशीच स्थिति कांहीं दिवस राहील तर तो फारच अकल्याण कारक होईल. आपल्या पैकी कांहीं असें म्हणतात कीं आपल्या धर्मांत कांहींच राम नाहीं पुराणांत व शास्त्रांत अतिशय योक्ति आहे त्या मुळें आमचा भरवसा त्यांवर बसत नाहीं. कित्येक ईश्वराचे पुतळे असें कांहीं आहेत कीं आपल्या धर्मा विरुद्ध वागणें म्हणजे मद्यपान वगैरे करणें हें भूषणच समजतात असा कोणता ही धर्म सांपडावयाचा नाहीं कीं त्या मध्यें व्यंगें नाहींत. असें जर आहे तर आपलाच धर्म धरून आपण वागणें हें इष्ट आहे त्यांत कांहीं सुधारणा करण्याची असेल तर जीं कांहीं धर्मसंबंधी पुस्तकें आहेत तीं वाचून त्यांतील पूर्णपणें इंगित जाणून काय काय फरक करणें जरूर आहे या विषयीं विचार करणें युक्त आहे. कांहीं एक विचार न करितां आपला धर्म वाईट दुसऱ्याचा चांगला हें म्हणणें मात्र केवळ मूर्खपणाचें होय. आपलें वर आपल्याला माहीत नाहीं अशी खात्री झाल्यावर ही आपल्या घराची माहीती करून घेण्याचें आपलें मनांत न येणें हें आश्चर्य आहे! जों पर्यंत ही गोष्ट मनांत येत नाहीं तो पर्यंत परह्रिपस्थ स्वतःच्या व आपल्या धर्मासंबंधी जें कांहीं सांगतात तें निमुटपणें ऐकणें भाग आहे. त्या प्रमाणें आपण इंग्रजी लोकांचें शिकण्यांत कला कौशल्यांत अनुकरण करितों त्या प्रमाणें धर्म संबंधी गोष्टींत कां करूं नयें. म्हणजे आपलीं मतें त्यांच्या प्रमाणें करावींत असा म्हणण्याचा हेतु नाहीं तर ते जसें धर्मोन्नति आणि धर्मवृद्धि करितां झटतात तसें आपण झटावें.

आपला
"मित्र"

## हल्लींची शिक्षण पद्धति.

(लिहून आलेला मजकुर.)

हल्लींची प्रजा फार अशक्त होतचालली आहे असाजिकडे तिकडे एकच आरडा चालली आहे व अशी अशक्त प्रजा निपजण्याचीं कारणें अनेक शोधून काढिलीं आहेत. तत्रापि पुष्कळ विद्वानांच्या मतानें "बालविवाह" हेंच मुख्य कारण ठरलें आहे. परंतु आमचे मतानें "बालविवाह" हें खरें कारण नसून हल्लीची "नूतन शिक्षण पद्धति" च ह्या गोष्टीस कारण आहे असें वाटते याकरितां हल्लीचे शिक्षण पद्धतीवर चार शब्द लिहिण्याचा आमचा विचार आहे. दिवसानुदिवस निरनिराळ्या खात्यांत जशा नवीन सुधारणा दृष्टोत्पत्तीस येतात, त्याच प्रमाणें शाळा खात्यांत अभ्यासा संबंधी अनेक सुधारणा आढळून येतात. नुकतेंच दोन वर्षां मागें या प्रांतांतील शिक्षणाचे अभ्यास वाढविले जावेत अशा विषयीं वटावाट होऊन त्याप्रमाणें गेल्या वर्षा पासून ती गोष्ट अमलांत आली. इंग्रजींत एक म्हण आहे कीं "A mother in law forgets that she was a daughter in law" या म्हणीची आठवण होते.

आमचे लोकप्रीय माजी रावबहादुर यांचे शिक्षणाचे कामांत असें मत असे कीं मुलें आठ वर्षांची होई तों पर्यंत त्याजवर शिकण्याची बळजोरी करूं नये. या मतास कोणी दोष देणारा निघेल असें आम्हास वाटत नाहीं. आमचे ही मत यामतास पूर्ण अनुकूळ आहे. पण तें अमलांत कसें आणावें हें मात्र आम्हांस सुचत नाहीं. आपण कोणत्याही शाळेंत जाऊन पाहिलें असतां आपल्या नजरेस येईल कीं शेवटच्या (पहिल्या इयत्तेतील) वर्गांतील विद्यार्थी बहुत करून पांच सहा वर्षांच्या वयाच्या आंतीलच असतीत. आतां इतके लहानपणीं मुलांना शाळेंत पाठविण्यापासून आपण त्यांचे पूर्ण नुकसान करितों यांत संशय नाहीं. कारण जें वय केवळ सुखांत व चैनींत [illegible]वावयाचें अशा वयांत त्यांज कडून माराच्या भीतीनें बारा तास अभ्यास करून घेणें ही गोष्ट फार दुःखाची आहे असें म्हटलें तरी चालेल. पण काय करावें? हा विचार पुष्कळांचे मनांत येतो व आपल्या मुलांचें आपण असें नुकसान करूं नये असें ही त्यांना वाटते पण करतील काय? हल्लीं अभ्यास इतके वाढले आहेत कीं मुलांना चौथे वर्षीं शाळेंत घातल्या शिवाय दुसरा मार्गच नाहीं. व जर कदाचित् एकाद्या विद्वान व विचारी मनुष्यानें आपल्या मुलास आठवें पर्यंत शाळेंत पाठविलें नाहीं व पुढें पाठविलें तर तिकडून ही लोकांचे तोंडून खालील मासलेवाईक उद्गार निघतात. "अमक्याचा हा मुलगा बारावर्षांचा घोडा झाला तरी अद्याप तिसरींतच" अशाप्रकारच्या उद्गारास भिऊनच बहुतेक लोक अल्प वयी आपलीं मुलें शाळेंत पाठवितात. पुढें परीक्षक हो बावन कशी सोन्या प्रमाणें ज्या अर्थी मुलांना कसासलावतात त्या अर्थी गरीब विचाऱ्या शिक्षकांना मात्र, वर्षांत न संपणारे अभ्यास असले तरी, ते संपवून त्यावर बाहेरील परीक्षकाचे आवडी प्रमाणें जास्त माहिती द्यावी लागते.

या मुलांना व्यायाम म्हणजे काय हें माहितच नसते. खरोखर मास्तर रात्रीं सुद्धा जर शाळेंत बोलावतात तर त्यांना व्यायाम कोठून माहीत असणार त्यांना reasoning power मुळींच नसते म्हटलें तरी चालेल. ह्यांचें सर्व शिक्षण यांत्रिक होतें. व यांत शिक्षकांचा ही पुष्कळ दोष आहे. कारण उच्च प्रतीच्या शाळां मधून Paraprase Translation &c असे विषय विद्यार्थ्यां कडून करून घेऊन त्यांच्या चुका दुरुस्त करून त्यांच्यांत सुधारणा करण्याची कोणीच तसदी घेत नाहीं. अशा प्रकारच्या विद्यार्थ्यांना (Paraprase) अगर Translation यांचा बुकाबाहेरचा प्रश्न घातल्यास त्यांचे हात थांबतात. शिक्षक लोक वरील सांगितलेले अशाच प्रकारचे दुसरे विषय त्यांचे कडून मुखोग्दत करून घेतात असें करण्यांत त्यांचा मुख्य उद्देश फक्त आपणास यश मिळावें एवढाच असतो. परंतु अशा प्रकारचे शिक्षकांना शिक्षण पद्धतीची खरी माहिती आहे असें मात्र चुकीनें सुद्धां कोणी कबूल करणार नाहीं.

अपरोक्ष रीतीनें पाहिलें असतां परीक्षेचे वेळीं केवळ मास्तर लोकांचीच परिक्षा घेतली जाते असें दिसून येईल.

हल्लीं आपले लोकांत म्हणच पडली आहे कीं पूर्वीचा —— Matriculated व हल्लींचा B. A. हे सारखेच. खरोखर आली कडील विद्वान् नामधारीच असतात. त्यांना कोणत्याच विषयांचे पूर्ण ज्ञान होत नाहीं. फार काय त्यांना स्वभाषेतील शब्द आठवण्याची प्रसंगानुसार मारामार पडते. त्यांच्या लेखन पद्धतीची ही अशीच स्थिती होते. फार अभ्यास असल्यामुळें त्यांना अक्षराकडे दुर्लक्षच करावे लागते. अशा विद्वानांचा धड इंग्रजीकडे ना धड मराठीकडे उपयोग होत नाहीं. कारण मराठी अक्षरास हायस्कुलच्या दारांत येतांच अक्षद द्यावीलागते. असो. यांत विद्यार्थी जनाचा मुळींच दोष नाहीं. कारण दिवसानुदिवस परीक्षा फार कठीण व यांत्रिक (पाठाच्या) झाल्यामुळें विद्यार्थ्यांना प्रत्येक विषय पूर्ण समजून घेऊन, व त्याजवर पोक्त विचार करून परिक्षेची तयारी करण्यास वेळच मिळत नाहीं. अशा शिक्षणरूपीं चिमन्याच्या बाहेर पडणारा मनुष्य किती सशक्त राहील याचा वाचकांनीं विचार करावा. अशा मनुष्याची संतती अशक्त झाल्यास त्यास बालविवाहाचाच सर्वस्वी दोष देता येईल काय? हल्लीं शिक्षणाचा प्रसार फार

the community must possess in order to improve and elevate the line of society in which he moves. Upon individual independence alone possessed by every adult member of the community can social freedom or political institutions be based.

---

It is a matter of sad impoit that cholera is reported to have again appeard in Akola after a cessation of a few days. The worthy Hospital Assistant Mr. Desouza is, as usual, taking pains in carefully attending to the patients.

Immediately on the out break of the disease our kind Sanitary Commissioner Dr. Little came down here and personally looked after sevral patients addition to the promt help which he gave by deputing a Special Hospital Assistant from Amraoti to do duty here. The public are thankful to the Doctor for this feeling of kindness displayed.

We are at the same time sorry to learn that our energetic Civil Sergeon Dr. Morran does not appear to think the occurrances so dangerous as to induce him to devote his valuable time and to render his skilful assistance to the sufferers the evil. We are led to believe in this by certain expression which he let fall in a conversation. It would be a matter of great interest if the expression were at all made and were an intentional one to know on what personal observation of the cases he was led to use it, more especially when so much was done by the Sanitary Commissioner in the matter of course under a conviction.

---

RESOLUTION.

11. As already stated, none of the measures proposed above need be expensive. All the materials and ladour required are on the spot, and most of the work could be done by the inhabitants of houses themselves; and they ought to be required either to do what is necessary or to pay for the doing of it, on the well understood principle that an unhealthy house is not only dangerous to its own inmates, but to its neighbours, and to the town generally.

if municipalities in small towns see that these measurs are carried out to the greatest practicable extent with the means at their disposal, they may confidently expect improved health and less liability to epidemic biseases.

12. But when cholera or fever, or any other epidemic, attacks a town, another duty is placed on the municipal authorities. in a small qopulation there ought to be no difficulty in discovering the houses in which there have been cases of cholera, fever, small-pox, &c.; and whenever it comes to the knowledge of the municipal authorities that the inmates of particular houses have been attacked, immediate inquiry should be made into the sanitary state of the house. It is not safe during epidemics to stir up filth or foul grond, but there is one measure which can be taken with perfect safety—namely, to remove all animals out of the house are compound and to cover all filth or foul ground, including cesspits, with clean earth, and in every such case the house well should be closed and water brought from outside the town. These tow measures, namely, providing good water, and covering all ful matter with earth, can always be adopted with safety and advantage during epidemics; and if any other measure be considered necessary it ought to be the removal of the people away from the affected house. When the disease has abated, the municipal authorities should proceed to improve the house and compound on the principles already mentioned.

(To be continued).

*HYDERABAD RESIDENCY ORDERS OCTOBER 1, 1888.*

The Resident is pleased to declare that the Court presided over by Mr. Suraj Narain, Assistnt Commissioner in the Basim District, shall be of 4th grade having jurisdiction up to *Rs.* 1,000,

---

Mr. Sadashiv Govend Dambe, Heab Master, Anglo-Marathi School Ellichpur Cantonment, is appointed to officiate as Deputy Educational Inspector of the Ellichpur District in addition to his own duties with effect from the 25th August, 1888 *vice* Mr. Keshev B. Paleker, who proceeded on one month's leave on private affairs from the 13th idem.

---

Under Section 6 of the Inian *Regi*stration Act 111 of 1877 the Resident is pleased to appoint Mr. Rangrao Bagho. Deshpande to be Sub-Registrar of the Nandgaon Kazi Sub District of the Amraoti District.

---

Under Notification of the Government of India, Foreign Deqartment, No. 156 dated the 30th September 1870, the Resident is pleased to declare abat the Court presided over by Mr. Balaji Bajram Officiating Tahsildar of pusad in the Basim District, shall be of the 1st grade having jurisdiction up to Rs. 1000.

The resident is pleased to direct the addition of the following *proviso* to rule III of the Rules (*Residency Orders Notifiction* No. 46, dated the 7th April 1888 framed under Section 33 of the Berar Rual Boards Law, 1885:—

*Proviso.*—Provided that no person who is less than twenty-one years of age and no female shall be entitled to vote at the election of members.

---

Mr. Harichund Tarachund of Anjengaon the Resident's acknowledgment of his meritorious and valuable public service in erecting at Anjengaon at his own expense a school-house for Hindu girls, which he has made over to Government.

Mr. Howell hopes that this example of public spirit will not lack followers among the wealthy citizens of Berar.

---

No. 3821 *I.*—In exercise of the powers conferred by sections 4 and 5 of Act XXI. of 1879 (The foreign Jurisdiction and Extradition Act, 1879), and of all other powers enabling him in this behalf, the Governor-General in Council is pleased to extend Act IV. of 1886 (an Act to amend section 265 of the Indian Contract Act, 1872) to the Hydrabad Assigned Districts.

---

The Nizam has written to Sir Syed Ahmed approving of the objects and aimed of the Patriotic Association, and has given a donation of Rs. 4,000 towards its fund.

---

## पोंच.

'एक दर्यापूरकर'—आपले पत्र आले ते पावलें. उशीरां आल्या बद्दल पुढील अंकीं घेऊं.

---

## वऱ्हाड

हवामानः— हवेंत ह्मणण्यासारखा गारवा नाहीं! हवेचा उपद्रव अद्याप कोठें कोठें आहेच. दोनप्रहरीं उन्ह चांगलें कडक पडतें. तापाचा आजार आहेच. पिकें बरीं आहेत.

---

पंडित सुरज नारायण अ. क. यांस १००० रुपये पर्यंत दिवाणी दाव्याचा निकाल करण्याचा अधिकार मिळाला.

---

रा रा. राघव ब्रह्मगिरी डे० ए० इ० हे एक महिन्याचे रजेवर गेले. त्यांचे जागीं रा. रा. सदाशिव गोविंद दामले, एलिचपूर कंटोनमेंट इं०म० शाळाचे हेडमास्तर यांस नेमलें.

---

रा रा. रंगराव राघव देशपांडे यांस नांदगांव काजी येथें सब रजिस्ट्रार नेमले.

---

रा० रा० बाळाजी राजाराम पुसदचे अ० फि० तहसिलदार यांस शभर रुपये पर्यंत दिवाणी दावे घेण्याचा अधिकार मिळाला.

---

सन १८८५ रुरल बोर्डच्या कायद्याच्या कलमान्वयें अलिशान रेसिडेंट साहेबांनीं जे नियम केले आहेत त्यांतील तिसऱ्या नियमांत आणखी नवीन तरतूद केली आहे कीं, २१ वर्षां पेक्षा कमी वयाच्या मनुष्यास व कोणत्या ही स्त्रीस मेंबराचे निवडणुकींत मत देण्याचा अधिकार नाहीं.

---

रा रा. हरीचंद ताराचंद राहणार अंजनगाव यांनीं आपल्या गांवीं हिंदुमुली करितां स्वतःच्या खर्चानें एक शाळा गृह बांधून ते सरकारास दिलें. ह्या त्यांच्या योग्य औदार्या बद्दल अलिशान रेसिडेंट साहेब यांनीं तारीफ केली आहे,

---

गेल्या पहिल्या तारखे पासून येथील व. उमरावतीचे खजिन्याचो व्यवस्था व देव घेव करण्याचें काम मुंबई ब्यांके कडे गेले.

---

येथें बदे शिक्षण देण्या करिता एक शाळा स्थापन करण्याचे सरकारानें मंजूर केलें तो रे. नि फुलर यांचे देखरेखा खाली राहणार.

---

येथील हायस्कुलातून १२ मुलें येत्या मॅट्रिक्युलेशन परिक्षेस जाणार.

---

इलिचपूर येथील दंग्याचा निकालः— या भयंकर दंग्यांत एकंदर ३८ इसम पकडले होते. त्यांस हल्लीं ता० २६ सप्टेंबर रोजी मुकद्दमा निवून त्यांची इंडीयन पिनलकोड कलम १४३ प्रमाणें २१ गुन्हे गारांचो संक्षिप्त चवकशी ( समरीट्रायल ) झाली. त्यांत सर्वांस प्रत्येकी १५-१५ रु. दंड आणि एक वर्षभर चांगल्या वर्तणुकाबद्दल जामीन व ५०-५० रु० चा जातमुचलका अशी शिक्षा झाली; त्यांपैकीं एकानें तक्रार केली ह्मणुन त्यास आणखी एक महिना कैद. ही शिक्षा झाली बाकीच पहिलें दिवशीं धरलेले १६ इसम यांची आज ( ता० २९ सप्टेंबर ) इं० पि० कोड कलम १४७ प्रमाणें रेग्यूलर ट्रायल ( योग्य चवकशी ) होऊन तिघां जणास प्रत्येकास एक एक वर्ष सक्त कैद, व १२ जणांस प्रत्येकांस नऊ नऊ महिन्यांचो सक्त केद अशी शिक्षा झाली.

---


## जाहिरात.

खालील सूचना आम्हांकडे प्रसिद्धी करितां आली आहे:—

आपल्या हिंदु धर्मा प्रमाणें इष्ट मित्रांस भेटण्याचे पुष्कळ सण आहेत त्या सर्वांचा कालमाना प्रमाणें संक्षेप होत चालला असून केवळ जिव्हाळ्याच्या माणसांचा व इतरांच्या भेटी मोठ मोठाल्या सणाच्या दिवशी सुद्धा होइनाशा झाल्या आहेत; यास्तव कांहीं मंडळीच्या मनांत सालमजकुरा पासून विजया दशमीचे दिवशी श्री राजेश्वराचें मंदिरांत सर्व लहान मोठ्यांनी जमून नंतर सर्वांनीं मिळून शीमोल्लंघनास जावें व परत मंदिरांत येऊन सोनें व पान सुपारी वांटणें झाल्यावर आप आपल्या घरी जावें अशा प्रकारचा प्रघात चालूं करावा असें आलें आहे. व त्या मंडळीच्या सूचने वरून आम्ही आकोलें येथील सर्व हिंदुधर्मानुयायी, शास्त्री, वैदिक, शेट सावकार, वकील, वैद्य व सर्व खात्यातील सरकारी नौकर अगर खासगी नौकर व सुखस्वतु लोक यांस विनंती करितो कीं विजया दशमीचे दिवशीं ह्मणजे ता० १४ माहे आक्टोबर सन १८८८ इ० रोजीं बारावर तीन वाजतां सर्वांनीं श्री राजेश्वराचें मंदिरांत जरूर जरूर येण्याची मेहरबानगी करावी.


---

## वर्तमानसार.

शेतकरी रिलीफ आक्ट

सन १८७६-७७ सालीं दुष्काळाच्यावेळीं सावकारांनीं कुळांच्या बचावाकरितां आपल्या थैल्या व कोठारें रिचविली. दुष्काळ उलोडल्यावर लोकांची स्थिती सुधारण्यास बरींच वर्षे लागलीं पण दुष्काळ उजाडल्या नंतर लवकरच हा शेतकरी कायदा सरकारानें केल्यामुळें सावकारांनीं रिचविलेल्या थैल्या व कोठारें सावकारांस परत झालीं नाहींत. शेतकऱ्यांची स्थिती सुधारल्या नंतर आपले पैसे व धान्य आपल्या घरीं परत येईल अशी जो सावकारांस आशा होती ती फुकट गेली. मिळून हल्ली कुळे व सावकार सारखेंच कफल्लक झाले आहेत. तेव्हां मागल्या दुष्काळांत रिलीफमध्यें ब्राह्मण वगैरे पांढरपेशे लोक भाकरी मागण्यास येत नाहींत हें पाहून ज्यांचे डोळे थंड झाले नाहीत त्यांचे आतां थंड होतील असा सुमार दिसतो. असो परमेश्वर सर्व समर्थ व नियंता आहे. तोच करील तर रक्षण होईल दुसरें कांहीं नाहीं.

क्राफर्ड साहेबांच्या चौकशीचें कमिशन येत्या महिन्याच्या २३ व्या तारखेस बसणार असें शेवटीं ठरलें आहे. लांबाच्या खटल्यांतील ५० खटल्यांची यादी प्रसिद्ध झाली आहे. त्यांत ७-८ पदवीवाले मामलेदार व डे. कलेक्टर यांजपासून लांच घेतल्याचे अरोप आहेत. भोरचे श्रीमंत पंतसचीव यांजकडूनही लांच घेतल्याचा एक खटला आहे. हा सर्वप्रकार अत्यंत खेदकारक आहे पण नशीबीं पाहाण्याचें आलें आहे तें पाहिलें पाहिजे. ह्या प्रकरणाचा अखेर निकाल होईपर्यंत आणखी किती कंटाळवाण्या गोष्टी ऐकण्याचा प्रसंग येईल तें सांगवत नाहीं.

— मि० आर्थर क्राफर्ड यांजवर शेट मोतीराम भागुभाई यांनीं २९०० रु. बद्दल गेल्या मंगळवारीं हायकोर्टांत फिर्याद करून आपल्यातर्फे हुकुमनामा करून घेतला असें समजतें.

पंजाब व वायव्य प्रांत इकडे गव्हांच्या व्यापारास फार तेजी आली आहे असें ह्मणतात.

— स्वाकीम व वाडी हल्फा येथें बंडावा जास्त वाढण्याचें चिन्ह दिसूं लागल्यामुळें कर्नल सेटल यांनीं जास्त फौज वाढविण्याबद्दल सूचना केली.

कर्नल निसबट हे काश्मीरचे रेसिडेंट होणार असें खास ठरलें.

जर्मनलोक शत्रूवर रात्रीचा हल्ला कसा करावा याबद्दल विचार करत आहेत.

— बंगाल्यांतील डिकु नदीच्या पलीकडे रहाणाऱ्या नगा लोकांनीं बंडावा करून दोन खेडीं लुटलीं. यांचें पारिपत्य करण्याकरितां कांहीं अमलदार सरकार पाठविणार असें कळतें.

हिंदुस्थानांत एकंदर १,८४,९८८ लोहार व ४,०१,००० सोनार आहेत असें ह्मणतात.

ज्यांच्याजवळ एक कोट रुपयांवर रकम आहे असे एकंदर ७०० गृहस्थ जगांत आहेत असें ह्मणतात. यांपैकीं २०० इंग्लंडांत आहेत, १०० अमेरिकेंत, १०० जर्मनी व आस्ट्रियामिळून, ७५ फ्रान्समध्यें, ५० रशियांत, ५० हिंदुस्थानांत व जगाच्या बाकीच्या भागांत १२५ आहेत असें एकानें शोधून काढलें आहे.

अमेरिकन लोकांची नेहमीची फौज सारी २५००० आहे. सु. प.

नेटिव लोकांस फौजेंतील मोठमोठ्या जागा दिल्या शिवाय शत्रूवर फौजा नेण्याचें कौशल्य त्यांस कसें येईल !

लढाऊपणाबद्दल ज्यांची कीर्ति झाली आहे, व लढाईशिवाय दुसऱ्या धंद्यांत पिढ्यानपिढ्या जे शिरले नाहींत त्यांच्या वंशजांस इंग्रज सरकार आपल्या सैन्यांत लष्करी आफिसरच्या मोठमोठ्या जागा देत नाहीं तेव्हां ही फार चांगली संधि आली आहे ह्मणून शिकविणाऱ्या इंग्रज आफिसराशिवाय इतर एकुणएक आफिसर नेटिवच ठेवावे दुसरे ठेऊं नयेत असा सक्त ठराव पाहिजे आहे तरच तो अमलांत येईल, व नेटिव लोकांची फार दिवसांची आशा तृप्त होईल.

दुसरी अशी गोष्ट मनांत ठेविली पाहिजे कीं ह्या फौजांवर आपलें स्वामित्व नाहीं असा यत्किंचित ही संशय नेटिव संस्थानिकांस येतां उपयोगीं नाहीं, असें ह्या एकंदर व्यवस्थेंत इंग्रज सरकारानें धोरण ठेविलें पाहिजे. जे तरुण संस्थानिक आहेत त्यांस फौजे बरोबर लष्करी शिक्षण देऊन लढाईमध्यें त्यांच्या फौजा त्यांनींच शत्रूवर न्याव्या अशी व्यवस्था करावी. राजा असो कीं रंक असो त्यानें तीन वर्षें खांद्यावर बंदुक टाकून लष्करांत नौकरी केलीच पाहिजे. असा युरोपांतील कांहीं देशांत सक्त ठराव आहे, तिकडील मोठ्या बलाढ्य देशाचे राजपुत्र तशी नौकरी बिन तक्रार करीत आहेत. तेव्हां इकडील राजपुत्रांच्या संबंधानें तसा नियम करण्यास काडी मात्र हरकत नाहीं. असें झाल्यास फौजेकडून व स्वतां शौर्य गाजवून कीर्ति मिळविण्याची संस्थानिकांस मोठीच हुरूप वाटेल. आपल्यांवर सार्वभौम सरकारचा पूर्ण विश्वास आहे असें पाहून संस्थानिकांस अतिशय आनंद होऊन त्यांची सार्वभौम सरकारावर खरी निष्ठा बसेल असें अनेक फायदे होणार आहेत.

मुंबई हायकोर्टाचा उपयुक्त ठराव

सन १८७६ च्या मामलेदार आक्टाप्रमाणें खटावच्या मामलेदारांनीं केलेल्या एका हुकुमनाम्याची दरखास्त वजावण्याकरितां मामलेदारांचा कारकून गेला, तेव्हां मैनाकोम श्रीपती इणें दारास आतून कडी लाविली. सरकारी नौकर सरकारी काम बजावीत असतां कडी लाऊन मैना इनें त्यांस प्रतिबंध केला अशी तोहमत तिजवर ठेऊन खटला केला. ठेवलेली तोहमत शाबीत ठरवून फर्स्ट क्लास माजिस्ट्रेट रा० ब० देशमुख यांणीं मैनास ५ रुपये दंड अगर तीन आठवडे साधी कैद अशी शिक्षा दिली. रिव्हिजनमध्यें ह्या खटल्याचें कागद पत्र हायकोर्टापुढें गेले तेव्हां "नवऱ्याची जंगम जिनगी जप्त करण्याकरितां कारकून आला असतां नांदत्या घराच्यादारांस आंतून कडी लावण्यांत मैना हक्काप्रमाणें वागत होती ह्मणून तिनें सरकारी कामांत सरकारी नौकरास आपखुशीनें हरकत केली असें होत नाहीं" असें ठरवून हायकोर्टानें तोहमत व शिक्षा रद्द केली आणि जमा झाला असल्यास दंड परत देण्याचा ठराव केला.

शु० सू०

पटकीवर फारच सोपें औषध एकानें प्रसिद्ध केलें आहे. तयार केलेला खडू ४ औंस, ६ औंस पाण्यांत कालवून दर अर्ध्या तासानें जुलाब बंद होई पावतों चमचाभर घ्यावें.

सर्पाचे तोंडावर तंबाकूची पिचक मारली असतां तो मरतो असें एकेठिकाणीं आमच्या पाहण्यांत आलें. कोणी अनुभव घेऊन कळविल्यास तर खरें.

हत्तिणींच्या गर्भाची पूर्ण वाढ होण्यास ६८० दिवस ह्मणजे सुमारें २ वर्षें लागतात असें ह्मणतात!

पाहिलें वर्तमानपत्र या जगांत सन १७०२ सालीं लंडन एथें एलिझाबेथ मॅलेट नांवाच्या स्त्रीनें सुरू केलें असें कळतें.

क०

हिंदुस्थानसरकारचे रवाना झालेले कुरम व्हाली मिशन हे गेल्या ९ व्या तारखेस खालची येथें पोचलें व त्याच दिवशीं आमच्या ठिकाणापासून सुमारें सोळाशें यार्डावर सरदार शेरिंडलखान याणे आपल्या हद्दींत आपला तळ ठोकला. ता. ८ रोजीं सकाळीं तो सरदार आमच्या कामदाराच्या भेटीस आला व दुपारीं आमचा कामदार त्याच्या भेटीस गेला व तेव्हां पासून उभयतांत बोलणें चालू आहे.

गंटक हें ठिकाण मागच्या रविवारी इंग्रजी फौजेनें घेतलें. आमची फौज दाखल होण्या पूर्वींच सीकीमचा राजा तें ठिकाण सोडून गेला होता राजा कोठें आहे हें कळलें नाहीं. आमच्या फौजेनें त्याच दिवशीं सकाळीं कुपप खिंडीवर गोळ्या सुरू केल्या जालपच्या शेजारीं पुष्कळ लोक आढळले. पण आमच्याशीं सामना करण्याचा त्यांणी यत्न केला नाहीं. सोमवारीं सकाळीं तुकोला येथें पुष्कळ तिबेटी लोक आहेत असें आढळलें व रात्री त्यांणीं त्या ठिकाणा भोंवतीं तट बांधला तेथें त्याचे सुमारें ३००० पासून ४,००० पर्यंत लोक असावे आमची फौज पुढें चाल करून जाण्याच्या तयारींत आहे.

नवे इंग्रज कामदार इजिप्त येथें आले व त्यांनी साकीमवर चालून जावें असा त्यांस हुकूम झाला आहे.

इजिप्त देशांतील साकीमची बातमी सांगवे कीं तिकडील दंगेखोर अरब लोक शेजारी असणाऱ्या इंग्रजी फौजेवर हल्ला करण्यास तयार झाले आहे व त्या इंग्रजी फौजेस दुसरी मदत दाखल होईपर्यंत इटालीचें एक लढाऊ गलबत मदतीस गेलें आहे.

काश्मीरांत दंगा करणाऱ्या हाजागे फौजेशीं सामना करण्याकरतां काश्मीरच्या महाराजांचा भाऊ रामसिंग यांस हाताखालीं कांहीं सैन्य देऊन पाठविलें आहे.

बरद्वान जिल्ह्यांत १५० चौरस मैल जमीन पूर येऊन वाहून गेली! असाच पूर येऊन मिदनापूर जिल्ह्यांतही बरेंच नुकसान झालें. ज्या स्थितींत ईश्वर ठेवील त्या स्थितींत राहिलें पाहिजे. ठा० अ०

आपली कला दुसऱ्यांस कळूं नये ह्मणून हे रशियन लोक किती गुप्तता राखतात त्याचें उदाहरण ह्मणून खालीं लिहिलेली एक विलक्षण गोष्ट एका इंग्रजी पत्रांत आली आहे, तिचा प्रसिद्ध झालेला सारांश आह्मी आपल्या वाचकांसाठीं येथें देतोः —

लोखंडी पत्रे रसिया देशांत जसे उत्तम प्रकारचे होतात, तसे ह्या पृथ्वीवर इतर कोठेंही होत नाहींत ह्या पत्र्यांच्या सफाईबद्दल रशिया देशाची फारच ख्याति आहे. पत्रे करण्याची मालकी रशियन सरकारापाशीं आहे. हे पत्रे तयार कसे करतात हें अद्यापि कोणासही बाहेर कळलेलें नाहीं. हे पत्रे तयार करण्याचा जो कारखाना आहे त्यांत जे जे मजूर खपतात त्यांस आपल्या बायकापोरांस व इष्टमित्रांस सोडून जावें लागतें त्या कारखान्यांत त्यांस आपलें सर्व आयुष्य घालवावें लागतें. ह्या कारखान्यांत काम करण्यास कोणी खुषीनें जात नाहीं. मजूर लोकांस धरून जुलमानें तेथें नेतात. ह्या प्रमाणें त्यांची व त्यांच्या कुटुंबांतील माणसांची तुटातुट होते. ते त्यांस बहुधा गेल्यासारखेच होतात. ते कारखान्यांत जीवंत आहेत किंवा मेले आहेत हेंही बाहेर कळत नाहीं. त्या कारखान्यांच्या सभोंवतीं मोठाल्या भिंती उभारल्या आहेत व हत्यारबंद शिपायांचा पाहाराही त्या भोंवतीं आहे. बाहेरील लोकांस हे कारागृह आहे कीं काय असा भास होतो. येथें येणेंप्रमाणें सर्व कडेकोट बंदोबस्त आहे. तो कशाकरतां ह्मणाल तर पत्रे करण्याची कृति इतर राष्ट्रांत कळूं नये ह्मणून असा जरी पक्का बंदोबस्त आहे तरी ही कृति बाहेर फोडण्याचेही बरेच प्रयत्न आंतील लोक करितात, ही पत्रें करण्याची कृति बाहेर कळविली म्हणजे कारखाना बुडेल व आपली सुटका होईल ह्मणून आंतील मंडळींनें बरेच यत्न केले आहेत परंतु ते सर्व साध्य झाले नाहींत ते नाहींत परंतु उलट देहांत शासन भोगणें भाग पडलें. नुकतेंच ह्या कारखान्यांतील कोणीं मजुरानें, ही पत्रे करण्याची कृति एका कागदावर लिहून तो कागद एका पतंगास बांधला व पतंग उंच उडविल्यानंतर तोडून टाकला. एका खेड्यांतील कांहीं गरीब बापड्या शेतकऱ्यास तो पतंग कागदासुद्धां मिळाला. त्यांस लिहितां वाचतां येत नव्हत्याकारणानें त्यानें तो कागद तेथील पोलिस चावडीवाल्यांस दिला. त्या पोलिसच्या लोकांनीं तो कागद वाचल्यावर, त्या कुणब्यानें जरी मोठ्या काकळुतीनें कळविलें तरी त्यांनीं त्या बिचाऱ्या शेतकऱ्यास तेचवेळीं यमसदनास पाठविलें. ज्या पोलीस कामगारांनीं हें वरील कृत्य केलें व तो कागद वाचला, त्यानें आपलें शेष आयुष्य त्या पत्रे काढण्याच्या कारखान्यांत घालवावें असा सरकारी हुकूम झाला!! ह्या प्रमाणें ही पत्रे काढण्याची युक्ति अद्याप पावेतों बाहेर कळलेली नाहीं.


## अवश्यपहा.

## गजकर्णावर रामबाण औषध.

वऱ्हाड व नागपूर ह्या दोन प्रांतांत हजारों लोकांस गुण येत आहे. गुणा बद्दल खात्री इतकीच कीं, गुण न आल्यास किंमत परत देऊं. गुणाबद्दल पुष्कळ सर्टिफिकिटें आहेत, त्यांपैकीं कांहीं बाटली बरोबर असलेल्या माहितीच्या कागदांत दिलीं आहेत. दर बाटलीची किंमत ०९ आणे.

## खरुजेवर मलम.

गुलाबी मुळींच झोंबत नाहीं. पांच चार दिवस लावल्यानें खरूज, फोड, आगपैण हीं खात्रीनें बरीं होतात. किंमत दर डबीस ०८ आणे.

## हींव तापावर गोळ्या.

कितीही दिवसांनीं येणारें हींव असो सुमारें १० अगर १२ गोळ्यांनीं बंद होतें. दर बाटलीची किंमत १२ आणे.

सूचनाः—हीं सर्व औषधें अनुभवलेलीं आहेत सबब रोग्यांस अशी विनंती आहे कीं गरज पडेल तेव्हां ह्या औषधांचा अवश्य उपयोग करून पहावा. प्रत्येक औषधास बंगी खर्च ०१ आणा. बंगी नाटपेड माहितीचा कागद बरोबर. हीं सर्व औषधें वऱ्हाडांत अकोलें येथें आमचे दवाखान्यांत रोख पैशानें अगर व्हा. पे. नें मिळतील.

कळावें.नारायण चिंतामण डाक्तर.


☞ हें पत्र आकोला येथें कै० बा० खंडेराव बाळाजी फडके यांचे "वऱ्हाडसमाचार" छापखान्यांत नारायण खंडेराव फडके यांनीं छापून प्रसिद्ध केलें.

साल अखेर
किरकोळ अंकास................४

नोटीशीबद्दल.
१० ओळीचे आंत रु० १
पुढें दर ओळीस ०१०६
दुसरे खेपेस.........०१

Advertisements
Below 10 lines...2Rs
Per line over 10..4as
Repetition perline3as

# वऱ्हाडसमाचार.

THE BERAR SAMACHAR.

VOL XXII | AKOLA MONDAY 15 OCTOBER 1888 | NO 41

वर्ष २२ | अकोला सोमवार तारीख १५ माहे आक्टोबर सन १८८८ इ० | अंक ४१

## जाहिरात.

संस्थान सोंडुर जिल्हा बल्लारी इलाखा मद्रास येथें श्रीकार्तिक स्वामीचें महास्थान आहे. तेथें येत्या कार्तिक महिन्यांत शुद्ध पौर्णिमेस आणि वद्य प्रतिपदेस या दोन दिवशीं महायात्रा भरणार आहे. तर यात्रेस येऊं इच्छिणाऱ्या मुमुक्षु लोकांच्या सोईकरितां खालीं लिहिल्या प्रमाणें टिकिटांचे दर ठेविले आहे.

| | रुपये. |
|---|---|
| पंचमृताभिषेक | २५ |
| सर्वांगाभिषेक | १५ |
| पादाभिषेक | १० |
| पादस्पर्श | ५ |
| दर्शनटिकिट | २ |
| बारावर्षांचे आंतील मुलास दर्शनटिकिट | १ |

कार्तिक शुद्ध १३ पासून तों कार्तिक वद्य १ पावेतों श्रीकार्तिक स्वामीचे डोंगरावर टिकिटें विकत मिळतील. दरवाज्यावर टिकिटें न दाखविता दांडगाईनें आंत प्रवेश करण्याचा कोणी प्रयत्न केल्यास त्याबद्दल कायदेशीर इलाज करण्यांत येईल तारीख १ माहे आक्टोबर सन १८८८ इसवी

सही भीमराव पोळ म्यानेजर श्रीकार्तिकस्वामी देवस्थान संवस्थान सोंडुर जिल्हा बलारी.

इकडे पाहूं नका!
फारच दुर्मिळ संधि!!

कायदेशीर रीतीनें
थोडक्या खर्चात मोठा लाभ!!!
रुपये ३५,०००
वांटून द्यावयाचे आहेत???

विशेष माहितीसाठीं एका कार्डावर आपला पत्ता कळवा, ह्मणजे प्रास्पेक्टस फुकट पाठविण्यांत येईल.

मेसर्स.जे भारतिया अँड ब्रदर्स,
जनरल मर्चन्टस अँड कमिशन एजन्टस,
फाकलंड रोड, भायखळा पोस्ट, मुंबई.

## पत्रव्यवहार.

ह्या सदरा खालील मजकुर पत्रकर्त्यांच्या मतास मिळून असतील असें समजूं नये.

दर्यापूर ता० ९-४-८८

रा० रा० वऱ्हाडसमाचार कर्ते यांस

वि० वि० खालील चार ओळींस जागा मिळेल असें जाणून लिहीत आहे, तर निराशा न व्हावी ही इच्छा आहे.

आकाश नेहमीं अभ्राच्छादित असतें. याआठवड्यांत जरी पाऊस पडला नाहीं, तरी पूर्वीं योग्य वेळीं पाऊस पडल्यामुळें शेतकरी लोकांच्या तोंडांवर तजेला आला आहे बारीक सारीक आजारांशिवाय रोगराई ह्मणण्या सारखी नाहीं.

आमच्या येथील लायब्ररी अगदीं मोडकळीस आली होती परंतु हल्लीं ती पुष्कळच भरभराटीस आली आहे. ज्यानें एक वर्षापूर्वीं तिजकडे पाहिलें होतें तो जर आज तिजकडे पाहील तर त्याला खरोखरच आनंद व आश्चर्य हीं झाल्यावांचून राहणार नाहींत लायब्ररीच्या इमारतीच्या भिंती फार जुन्या व वेड्यावांकड्या असून त्यांची साधारण प्रकारचीच रिपेरी होत होती ह्मणून ती एखाद्या वृद्ध फाटकेंतुटकें वस्त्र नेसलेल्या बाईप्रमाणें दिसत होता, व तिजकडे पाहण्याला कोणाचें ही मन घेत नव्हतें परंतु आजकाल ती नीटनेटकी, चित्रविचित्र रंगाचे कपडे परिधान केलेली अशी मनोहर तरुणी बनली असल्यामुळें तिच्याजवळून जाणाऱ्या येणाऱ्या प्रत्येक मनुष्यांचे मन ती आपणाकडे ओढून घेते. जिला पूर्वीं सुर्यास्त होण्यापूर्वीं आपलीं सर्व कामें आटोपून अंधारांत फाटक्या वाकळीवर पडावें लागत असे ती आतां आपल्या मित्रांबरोबर इंग्रजी फॅशनचे मुनलाइटस पंखे अशा दिव्यांच्या झक प्रकाशांत शुभ्र धुनगच्ची तटानें वेष्टित अशा सुंदर रमणीय बागाची सुगंधी हवा घेत बसून कोणाबरोबर खेळत, कोणा बरोबर मनोरंजक गोष्टी करीत आणि कोणाबरोबर आनंदानें वादविवाद करीत बसत असते जिच्या सेवेस पूर्वीं एखादा सेवक असेनसे तिच्या भोवतीं हल्लीं कांहीं पगारी व कांहीं ऑनररी असे पुष्कळ सेवक आपापलीं कामें करण्यास तत्पर असतात. कोणी हिशेब लिहिताहेत, कोणी तिचा पत्रव्यवहार चालवीत आहेत, कोणी सामान सुमानाची देखरेख पहात आहेत, कोणी हिशेब तपाशीत आहेत, आणि कोणी तिच्या बागेंतील झाडांस व वेलींस सुबक आकार देत आहेत असें नेहमीं दृष्टीस पडतें. तिच्या प्रियांना वाचण्या करितां तिनें इंग्रेजी मराठि उर्दू निवडक पुस्तकांचा संग्रह बराच केला आहे तसेंच तिचा नेहमींचा खर्चवेंच भागून तिच्या जवळ द्रव्याचा संचय बराच होत आहे सारांश तिची बरबर हल्लीं इतकी होत आहे कीं तिला अकरावा, ब्रहस्पतीच आला आहे असें म्हटलें पाहिजे.

ही लायब्ररी अल्प काळांत एवढ्या उर्जित दशेस येण्यास कारण आमचे येथील लोकप्रीय खटपटी, सार्वजनिककामांत मनापासून झटणार, आणि आपले ताब्यांतील रयतेच्या हिताविषयीं कळकळ बाळगणारे, असे हलींचे तहशीलदार मे. शाहापूरजी भाई साहेब हे होत यांनीं तालुक्यांतील जमेदार, साहुकार वगैरे लोकांचीं या स्तुत्य कामाकडे मनें वळवून बरीच वर्गणी जमा केली. येव्हढेच नव्हे तर तालुक्यांतील १।२ ठिकाणीं अशा प्रकारच्या लायब्ररयाही स्थापन करण्याची तजवीज केली आहे. या कामांत त्यांचे येवढें लक्ष्य आहे कीं ते दररोज लायब्ररींत जाऊन-जातीने सर्व गोष्टींची देखरेख करितात ज्यांचीं मनें अशा प्रकारच्या कृत्याकडे कधीं वळावयाची नाहींत त्यांची देखील मनें यांनीं युक्ति प्रयुक्तीनें वळविलीं आहेत. अशा सार्वजनिक कृत्याकडे यांचे फार लक्ष्य आहे त्याबद्दल यांची स्तुती करावी तितकी थोडीच या उद्योगी गृहस्थाचा लायब्ररीस पुष्कळ दिवस आश्रय राहो ही आमची मनापासून इच्छा आहे.

'एक दर्यापुरस्थ'

मुक्काम किल्ला नरनाला. ता० ८-१०-८८

रा. रा. वऱ्हाडसमाचार कर्ते यांसः—

कृ० सा० नमस्कार विनंति विशेष. मागील पत्रांत अभिवचन दिल्या प्रमाणें आकोट येथें ता० ३०—९—८८ रोजीं भरलेल्या सभेची हकीकत यापूर्वींच देण्यास पाहिजे होती परंतु माझें गमन दुसरीकडे झाल्यामुळें ती देण्याची तशीच राहिली. ती व ह्या किल्याची माहिती या दोन्ही बद्दल खालीं लिहिलेल्या चार ओळीं आपणाकडे प्रसिद्ध होण्या करितां पाठविल्या आहेत त्या वहिवाटी प्रमाणें येतें अंकांत छापून प्रसिद्ध कराल अशी आशा बाळगतो.

गेले रविवारी ह्मणजे ता.३०—९—८८ रोजीं दिवसां सुमारें चारवाजतां ठरल्या प्रमाणें लायब्ररींत सभा न भरतां इंग्लिश मराठी शाळेंतील मोठ दाटनांत भरली होती. बाहेर गांवचे व आकोटचे मिळून सुमार दोनशे लोक जमले होते. त्यांत बाहेर गांवचेच पुष्कळ असून आकोटचे फारच थोडे होते असें समजलें. जागेचे मानाने फारच गर्दी झाली होती असें ह्मणण्यास हरकत नाहीं. नेमलेल्या दिवशीं नेमल्या वेळीं सर्व बाहेर गावचे लोक हजर झाले एवढ्या वरून असें खास दिसतें कीं राष्ट्रिय सभेची आवश्यकता आहे व तीस आपण मनापासून होईल तितकी मदत करावी असें वाटूं लागलें आहे व असाच क्रम जर सतत दोनतीन वर्षे चालूं ठेविलातर न बोलाविता न सबरतां लोक आपोआप जमून खटपट करण्यास सूरू करतील. असा माझा तर्क आहे. अध्यक्ष बसण्याचे जागीं दोन खुर्च्यांवर दोन गृहस्थ बसले होते. पैकीं एक तहसीलदार व दुसरे जमादार गनुसींग हे होते. सभेच्या कामाची सुरुवात व विसर्जन ही दोन्ही रा. रा. तांबे हेडमास्तर यानींच केली. कारण मधें कोणी कांहीं सुचना आगर भाषण वगैरें केलें नाहीं इतकेच नाहीं तर आध्यक्षांनीं ही तोंडातून एक ब्र सुद्धां काढला नाहीं. खरेंच तसें करण्याचें कांहीं प्रयोजनही नव्हतें. हेडमास्तर साहेबांनीं एक लहानसा निबंध पहिल्यानें राष्ट्रीय सभेसंबधानें वाचला व नंतर आकोल्यास १६ तारखेस भरणारे सभेस आकोट तालुक्याचे तर्फे मुखत्यार जाण्यास तयार असणारे उमेदवारांचीं नांवें वाचून दाखविलीं. तीं सुमारें ४० होतीं. जमलेल्या मुखत्यारांनीं सर्वांनुमतें यादींत दाखल केलेले लोक आमचे तर्फे जाण्यास योग्य आहेत. असें ठरविलें. निवड बरोबर झाली नाहीं व अशीं निवड करण्याची रीत नाहीं असें दोनच्यार गृहस्थ आपतसांत कुजबुजत होते तितक्यांत हेडमास्तर साहेबांनीं उठून निवड करण्याची रीत कशी आहे ती यावेळें आमलांत न आणण्याची कारणें सांगुन त्याचा उपयोग पुढील वर्षीं करावा अशी सूचना केली ती सर्वांस पसंत झाली व आखेरीस आध्यक्षाचे व जमलेल्या मंडळीचे हेडमास्तर साहेब यांनीं आभार मानून सभा विसर्जन केली.

नरनाला किल्ला आकोट पासून सुमारें सात कोस असून त्या पैकीं दोन कोस तर चढाव आहे ह्या किल्यावर जाण्यास कच्ची अगर पक्की सडक मुळींच नाहीं. ती असणें हे चांगले आहे व ती थोडक्यांत होण्या सारखी आहे. कारण रस्त्यावर टाकण्यास दगड पुष्कळ असून अगदीं जवळ आहेत. हा रस्ता पक्का झाल्यास त्याचा उपयोग बाजारकरू लोकांस फार होणार आहे. फारेष्टांतून लाकडें वगैरे माल मोठ मोठे बाजारांत नेण्यास जसा मेलघाट रस्ता तयार होत आहे त्या प्रमाणेंच आकोट पासून नरनाल्या पावेतों सडक तयार केल्यास कारंजे एथे जो लाकडाचा मोठा बाजार भरतो त्यांस फारच उपयोग होणार आहे त्या प्रमाणेंच अधिकारी व किल्यावर जाणारे इतर लोकांस हा उपयोगी पडणार आहे या करितां सरकारनें लक्ष्य देऊन इंजनेर अगर लोकलफंडातून हें काम करावें अशी सूचना आहे, आकोटाहून निघालें ह्मणजे पहिल्यानें औरंगाबाद ह्मणून एक उजाड खेडें लागतें. गांवाचें नांव मात्र मोठें पण लक्षण खोटें आहे. त्या नंतर नागपूर ह्मणून लहानसें खेडें लागतें व नंतर बोर्डी ह्मणून गांव लागतो एथपर्यंत तीन कोस होतात हा गांव लहानसा असून येथें बाजार भरतो. बाजारा करितां ओटे व घरें बांधलीं आहेत या घरांचा उपयोग बाजारचे दिवसा शिवाय उतारकरू लोकांस फार होतो या तालुक्यांत ज्या ज्या ठिकाणीं मोकी ह्मणून बांधिलीं आहेत त्यांचा उपयोग लोक बहुत करून धर्मशाळे प्रमाणें फार करतात असें दिसतें. एथून दोन कोसावर शाहानूर या नांवचे किल्याचे पायथ्यापाशीं लहानसें खेडें आहे. या खेड्यांत फक्त दोन चार गोंडांचीं झोंपडीं आहेत. बोर्डीहून एथें गाडींत येणें ह्मणजे फारच श्रमाचें दगदगीचें काम आहे. बोर्ड्यावर जाणें

पुढां हळूं हळूंच गेलें पाहिजे, कारण सर्व रस्त्याभर टोळ पसरलेले दिसतात व एक दोन ठिकाणींच चढण ही फार भयंकर आहे. इतके असूनही मी सुमारें प्रातःकाळचे सात वाजतां पायथ्यापाशीं येऊन पहोचलों. येथून वर चढण्यास साहेब वगैरे लोकांकरितां सरकार खर्चानें चांगली वाट तयार केलेली आहे. व तिची दुरुस्ती दरवर्षी तशिलदार मार्फत होत असते असें कळलें. या किल्ल्यापासून जवळच कासोद ह्मणून गांव आहे. तेथें लांकडाचा मोठा बाजार भरत असतो. येथें पाणी पिण्याकरितां विहीर आहे परंतु तिची दुरुस्ती नसल्यामुळें व झाडांचीं पानें आंत पडल्यामुळें पाणी अगदीं कडू लागतें [illegible]रता शिवाय करून चोहोंकडे पहावें तों हिरवागार किर्र झाडीं दिसूं लागली. माझी [illegible]र चढण्याची वेळ सकाळची असल्यामुळें [illegible]डी थंडी थंडीही वाजत होती रात्रीं [illegible]व पडल्यामुळें झाडांचें पानांवर व गवतावर सूर्य किरणामुळें मोती बिंदू सारखा [illegible]स होत होता. त्या वेळचा देखावा पाहून खरोखर मनुष्यमात्रांस आनंद झाल्याशिवाय रहाणार नाहीं. मला तर एकीकडून देखावा पाहून आनंद होत होता व दुसरी कडून थोडेसें भयही वाटत होतें. कारण या ठिकाणीं श्वापदें वगैरे आहेत असें [illegible]ला कळलें होतें, मी ज्या रस्त्यानें वर चढूं [illegible]गलों तों निव्वळ पायी जाणाऱ्या करितांच [illegible]लेला आहे असें दिसलें. घोड्यावर बसून [illegible] मोठ्या मारामारीनें व श्रमानें जातां ये[illegible] सुखानें व श्रम न होतां ज्यास वर [illegible]र्णे असेल त्या करिता मेण्या सारखी [illegible]क खुर्ची अकोट येथें तयार ठेविली आहे. [illegible]ंत बसून जाणें थोडे खर्चाचें काम आहे [illegible]रण ती खुर्ची नेयास सुमोरें वीस भोई [illegible]गतात. बहुत करून साहेब लोकांशिवाय [illegible]ंत कोणी बसून जात नाहीं. इतका जरी [illegible]ता बिकट आहे तरी कांहीं वर्षां पूर्वीं [illegible] साहेबांनीं आपली मोठी गाडी लोक[illegible]वून हवा खाण्या करितां वर नेली होती [illegible] ह्मणतात. रस्त्यास चढ फार असल्या[illegible] मी पहिला टप्पा जों चढून जातों तोंच [illegible] भरून अल्पामुळें मटकन खालींच [illegible]लों खालीं थंडी वाजत होती परंतु येथें [illegible]गांतून घामाच्या धारा चालूं लागल्या या [illegible]णीं थोडीशी सपाट जमीन दृष्टीस पडली [illegible]याच ठिकाणीं मुसलमान लोकांच्या हाजा[illegible]दगडी कबरा आहेत. या इतक्या लोकांस [illegible] किल्यावर नाहीं व धड खालींही नाहीं [illegible]ा भलत्या एकाच ठिकाणीं कां व कशा [illegible]रतां पुरलें असावें हें कळण्यास आतां मा[illegible]नाहीं या ठिकाणीं दोन्ही बाजूस मोठ मो[illegible] खोलदऱ्या व ह्या कबरा पाहून येथील [illegible]ावा बराच भयंकर दिसतो. रस्त्याचे बाजू[illegible]पाचीं झाडें फार आहेत. येथून जों मी [illegible] लागलों तों शाहानूर दरवाज्यांत जाऊ[illegible]ोंचलों. ( हा दुसरा टप्पा. )

[illegible]पत्रकर्तेराव पत्रकार लांबले या करितां [illegible] पुरें करितों. राहिलेली माहिती पुढील [illegible] कळवीन कळावे लोभ असावा ही [illegible]ी.

आपला

एक " क्ष "

वऱ्हाडसमाचार.

मिती आश्विन शुद्ध ११ शके १८१०.

सर्वत्रच मुनसिपाल कमिट्या आरंभीं लोकप्रिय नसतात. याचें कारण शोधण्यास फारलांब जाणें नको. त्यांचा गांवांत अमल आल्या मुळें गावांतील लोकांस त्या कमिट्या नसतां ज्या कित्येक गोष्टींच्या संबंधानें मोकळिकी असतात त्या नाहींशा होतात व त्या नाहींशा झाल्या मुळें लोकांस बऱ्याच अडचणी वाटतात आणि त्या अडचणा जरा न्याय्य व त्यांच्याच सुख सोई करितां असतात तरी त्यांनीं त्या आरंभी वरचे दिवस अन्यायाच्या आणि असह्य वाटतात. तेव्हां अर्थातच ज्याच्या अमला मुळें ह्या असह्य अडचणा येतात त्या मनसिपाल कमिट्या त्याना अगदीं अप्रिय वाटतात. पण हें फक्त नवीन कमिट्यासच लागूं. लोकांनां कमिट्यांच्या अमला पासून झालेलीं गावातील सुख सोवनें जसजशी नजरेस पडूं लागतात व त्या अमला पासून खरोखरीच हित आहे हें त्यांस जसें जसें चांगले समजूं लागते तसतसा त्यांचा कमिट्यां विषयीं वाईट ग्रह जाउं लागून त्यांच्या मनांत त्यां विषयीं कृतज्ञ बुद्धी उत्पन्न होऊं लागते. असा प्रकार बहुधा सर्वत्र दृष्टोत्पत्तीस पडतो. असें असतां, आमची कमिटी स्थापन होऊन आज जवळपास १९ वर्षें होत आलीं तरी ती अद्याप लोकांत अप्रियच आहे, त्यांचीं खरीं कारणें काय असतील तीं असोत; तीं सारीं कोणतीं हें पाहूं जाणें जरी फारसे कठीण किंवा अशक्य नाहीं, तथापि तसें करण्याचे श्रम न घेतां आमच्या कमेटीच्या संबंधानें लोकांत अप्रियता उत्पन्न करण्यास ज्या एक दोन ठळक ठळक गोष्टी कारणभूत झाल्या आहेत व लोकांच्या नेहमीं बोलण्यांत येतात व ज्या संबंधांत ते कमिटीविषयीं आपली तिरस्कारबुद्धि प्रदर्शित करतात, त्यांचा येथें अगदीं थोडक्यांत उल्लेख करून कमिटीस हो दोन शब्द आज सांगावे असा आमच्या या अंकाच्या लेखाचा उद्देश आहे.

ज्या गोष्टीचा आह्मी उल्लेख करणार त्या ह्मणजे अगदीं नवीन किंवा अप्रसिद्ध आहेत असें नाहीं. त्यांतून कित्येकांच्या संबंधानें तर कमिटीस न्यायाच्या कोर्टापुढें आपला जबाब देण्यास जावें लागलें आहे. रा० रा० पन्हाळकर यांजपासून कमिटीनें त्यांची जमीन अन्यायानें हिसकावून घेतली व ती शेवटीं, न्यायाच्या कोर्टांत कमिटीस आपलें कृत्य न्याय्य होतें हें पुरतेपणीं सिद्ध करून दाखवितां येईना ह्मणून, आपसांत समजूत काढून परत द्यावी लागली. ही गोष्ट बरीच प्रसिद्ध व जुनी आणि तिच्या संबंधीं आमच्या ग्रामस्थ वाचकांनीं इतकें चर्वीतचर्वण केलें आहे कीं तिच्याविषयीं आतां नुसतें बोलणें सुद्धां कंटाळवाणें वाटतें मग लिहिणें तर पाणचट वाटणारच. या करितां आतां या गोष्टीचें आह्मी कमिटीस नुसतें स्मरण देतों. दुसऱ्या ज्या गोष्टीचा आह्मी आतां उल्लेख करणार ती रा. रा. कृष्णाजी दिनकर यांचे घरा मागून जाणारी पुरातन गल्ली बंद करण्याचे संबंधानें; व तिची चौकशी हल्लीं न्यायाच्या कोर्टांत चालूं आहे. प्रत्येक गोष्टींत सर्वसंमत संप्रदायानुरूप बहुमतच ग्राह्य असते आणि त्या प्रमाणें ह्या गोष्टींत त्याचें जर अवलंबन केलें तर ती गल्ली बंद करणें अगदीं अनावश्य व अन्यायाचें आहे असें स्पष्ट दिसून येईल. कमिटीनें ती पोलीसाचे रिपोर्टावरून बंद केली असें ह्मणतात पण पोलिसांनीं आपल्या रिपोर्टांत त्या गल्लींत कंदील लावावा, तेथील रस्ता मोठा करावा किंवा ती गल्ली बंद करावी, ह्मणून सुचविलें होतें असेंही ह्मणतात. इतके उपाय जेथें पोलिसांनीं सुचविले तेथें अगदीं सोपा व न्यायाचा, जेणेंकरून लोकांचें खरें हक्क कायम राहून ते संतुष्ट रहातील असा उपाय योजावयाचा तो सोडून भलत्याच उपायाचें कमिटीनें अवलंबन केलें हें चांगलें केलें नाहीं.

( पुढें चालेल. )

राज्यें त्यांचा कारभार चालण्याच्या रीतीवरून तीन प्रकारचीं गणलीं आहेत. एक, राजसत्ताक, दुसरें, महपुरुषसत्ताक आणि तिसरें, लोकसत्ताक पहिल्यांत सर्व सत्ता राजाचे हातीं असते; दुसऱ्यांत ती राज्यांतील बड्या लोकांचे हातीं असते; आणि तिसऱ्यांत ती सर्व लोकांच्या हातीं असते. कोणतीही गोष्ट कितीही बारकाईनें, कुशलतेनें आणि शहाणपणानें केलेली असली तरी तींत कांहीं तरी व्यंगें असतातच, एवढेंच कीं तीं व्यंगें त्या गोष्टींत असणाऱ्या चांगल्या तत्वाशीं तोलुन पाहिली असतां विशेष मोठीशी वाटत नाहींत. त्याच प्रमाणें ह्या राज्य कारभाराच्या पद्धती जरी चगांल्या आहेत तरी त्या अगदी सर्वस्वी तशा नाहींत. त्यांतील प्रत्येक पद्धतीत कांहींना कांहीं तरी व्यंगें आहेतच. आणि त्वाच्या करितांच जगांत जीं हल्लीं सुधारलेलीं राष्ट्रें आहेत, त्यांत वर सांगितल्या पैकी कोणत्याही एका पद्धतीवर राज्य चालत नाहीं तर ह्या तिन्ही पद्धतीवरून काढलेल्या मिश्र पद्धतीवर चालतें; आणि तेणें करून ह्या तिन्ही पद्धतींपासून जे लाभ होतात ते होऊन त्यांतील व्यंगांपासून जे तोटे होण्याचा संभव असतो ते टाळतां येतात. उदाहरणार्थ आपण इंग्लंद देशाचे राज्य घेऊं. तेथें राजसत्ताक राज्य म्हणावें तर तें नाहीं, महापुरुष सत्ताक राज्य म्हणावें तर तें नाहीं किंवा लोकसत्ताक म्हणावें तर तें ही नाहीं; तर तेथें राजसत्ता, बडे लोकांची सत्ता आणि लोक सत्ता, यांतील कोणती ही स्वतंत्र पणें चालत नसून तिन्ही सत्ता सारख्या चालतात आणि त्या मुळे त्या परस्परांस योग्य बंधनासारख्या होऊन त्या सत्ता पासून होणारें लाभ मात्र होतात व त्यांतून कोणतीही स्वतंत्रपणें चालली असतां ज्या अडचणी व जे तोटे होण्या सारखे असतात ते टळतात. ह्या पद्धतीवर त्या देशाचे राज्य चालत असल्या मुळें तेथील लोकांचें दिवसांदिवस खरें कल्याण, व देशाची सर्व प्रकारें खरी उन्नती हो कशी होत आली आहेत व आज ती कितपत पूर्ण दशेस येऊन पोहचली आहेत हें ज्यांस पाहणे असेल त्यांनीं इंग्लंद देशाच्या इतिहासाचें चांगलें बारकाईनें अध्ययन करावें, ह्मणजे त्याच्या तें सहज लक्षांत येईल.

आमचा देश वरील संबंधांत खरोखरच फार दुर्दैवी आहे. त्यावर पाश्चिमात्यांचा अमल येण्यापूर्वी अनेक राजसत्ताक राज्यें झालीं व तें राजे अगदीं स्वेच्छाचारी असल्या मुळें त्यांच्याहातून अवाल्या सत्तेचा अपव्यय बराच होत असे, आणि त्यामुळें देशास जरी त्यांचे कारकीर्दींत बरेच चांगले चांगले लाभ झाले तरी त्यांच्या स्वेच्छाचारापासून व कर्तव्यकर्माकडोले दुर्लक्षापासून कित्येक गोष्टींत फारच मोठी हानी झाली. नंतर पुढें पाश्चिमात्यांचा अंमल आला. त्यांत आरंभी इकडे प्रवर्तक सत्ता, इकडे व्यापाराकरितां ह्मणून आलेली व पुढें हळूहळू राज्य मिळवून महत्वास पावलेली जी कंपनी तिच्याच हातीं येऊन ती मग सरकार बनली; आणि विधायक सत्ता इंग्लडांत एक बोर्ड डायरेक्टर्स ह्मणून सभा असे तिच्या हातांत असे. कंपनीं प्रमाणें हो बोर्ड आफ डायरेक्टर्सची सभा ही आरंभी व्यापार निमित्यानेंच स्थापन झाली असावी कंपनीच्या समक्ष कित्येक वर्षें हिंदुस्थानांत नबाबी थाटाचें राज्य चाललें होतेंच तेव्हां अर्थात तिनें आपलाही अम्मल साधारणतः नबाबी थाटावरच चालविला.

( पुढें चालेल. )

**DONT LOOK AT THS!**

**RARE OPPORTUNITY!!**

**POFITABLE LECALINVEST MENT!!!**

**RS 35.000.**

to be gevin away!!!

*For qarticulars—aqply. for prospectus (to be gad gratis) to* MESSRS.

J. BHARTIA & BROTHERS,

*General Merchants and commission agents,*

FALKLAND,

BYCULLA POST,

BOMBAY.

The Berar Samachar

MONDAY OCTOBER 15, 1888.

## THE AKOLA MUNICIPALITY.

In our issue of the 10th Ultimo, we said a few words of advice as to the way in which a member should, as in duty bound, discharge his trust. The tone which we used was general, but today we mean to write in abstract on the working of the local municipality in the financial branch. We are sorry that we have not authenticated data before us to help us in our present task. It is therefore possible that some mistakes might be made in the absence of such data and we

leave this open to correction by the parties who are best positioned to do it.

Some fifteen years ago the income of this municipality was very poor as compared with its present income. Since that time vast improvement has been made in the sanitary condition of the town owing to increased means at the command of the institution and the gratuitous energies of our able and esteemed Vice President, Rao Saheb Deorao Vinayak. We must however take this opportunity of removing an erroneous opinion, which appears to have been held by some persons that the agency previous to the existing one did not do so much as that done by the latter and the only reason which they urge (a superficial one and one which a school boy would be justified in urging) is that a great deal of improvement is apparent in the sanitary condition of the town and in a few other things over that which existed during the regime of the old agency.

But they are mistaken in their view in as much as to form a decided comparative opinion in the matter it is necessary that the difficulties and advantages in each case should be judged. Formerly, as stated above, the income of the municipality was barely one-fourth of what it is now and the gentlemen who had municipal management at the time could not have been expected to do more than what they did. By speaking this we do not mean in any way to underrate the good work done by our RaoSaheb, but simply to remove, if it exists, the opinion above referred to.

With the increase of income the responsibility of usefully utilizing it also increases. From what we have heard said and what, from time to time, has oozed out in respect of financial management we are reluctantly led to believe that it is not satisfactory.

In the first place we take the municipality to task as to why they have not been publishing the municipal accounts in any of the local papers. We know that the practice has been adopted by almost all the important municipalities in other provinces and we are at a loss to see what special circumstances there could have been against it in respect of this municipality. Surely the honorable gentlemen do not think that the public have no right to watch over the realization, utilization with care of municipal income. Then what must be the cause of the absence of the publication? Is the municipal establishment so hard worked that they cannot find time to attend to this work or are the local news papers unwilling to devote, without payment, some space for this purpose? The former does not appear to be the case, as we are led to believe that the office establishment is more than enough for the purpose for which they are entertained. As for the latter, we must tell that there cannot be a shadow of doubt as to the willingness of the papers. The question then again comes up what must be the cause of the municipality not publishing their accounts, and we must express our inability to solve it. The municipality is the proper party to satisfactarily explain it, as any attempt at the thing by any other person would be based on surmises only; and we sincerely hope that the Vice President will be kind enough on behalf of his colleagues to enlighten the public on that head.

Owing to the above mentioned facts we are not in a position to say any thing specifically as regards management of finance and we will therefore for the present touch upon a few things which have come to our knowledge as said above.

The income under Town Fund has greatly increased since the time Government servants were made liable to be assessed to the tax on their full year's income instead on that of a quarter as previously done. The accounts of the demand realization and balance of the fund are, we learn, in a very bad state. We are told that it has become a chaos. The first step to an efficient management of finance is correct account keeping and if the municipality cannot secure it, it is a matter of doubt if the public can be made to believe in the correctness and propriety of whatever they do.

We have also reason to believe that economy is not attended to in many respects, as we never see any notice calling for tender for the construction or repairs of any engineering work, for the supply of articles, for printing work or the like. Every one will be with us in thinking that by the above mode, work is done at the cheapest possible rate. Will the municipality give any reason in support of their action in the matter?

At times there are earwhishperings that the executive authorities do many things on their own responsibility never thinking that they have to consult with and to obtain the assent of a majority of their colleagues. We on our part do not believe in this as it is not possible at least in the case of our enlightened Vice President Rao Saheb Deorao Vinayak.

In conclusion we again say that owing to the absence of authenticated information, we have been unable to say anything authoritatively and thus compelled to write on surmises, suppositions and hearsay information, which we would never have done had the matter not been of importance affecting the vital interests of the public and expect to be excused for the same reason for any misstatements we might have made. We also express a hope that the worthy Rao Saheb will kindly satisfactorily remove any impressions on our part which he deems erroneous.

---

We are glad to announce to our readers that the Government has, at last, sanctioned, as an experimental measure, the establishment of an industrial school at Akola as proposed by Reverend Mr. Fuller of the American Mission. During the short time Berar has been under the British administration it has made an incredibly rapid progress in liberal education; and we hope the inhabitants of the Province will not fail to eagerly avail themselves of the very limited means of receiving professional education which the Government has, now, after repeated entreaties, given them and will, ere long, show themselves to be as capable and promising in this kind of education as they are in the other. Western education has, as it has been of the opinion of some of our old native gentlemen, produced, on the minds of our young educated men, an effect which makes them dispise all old customs and manners, however good they may be, and fills their hearts with irreverence for those whom they ought to revere on account of their age, position or education; but it is impossible, and it would be absurd to fear that this kind of education, given by any system, will have any but the desired effect. The school is to be under the management of a gentleman of a Mission; but he has been strictly forbidden to practise preaching in it; and no fear of religious interference need therefore be entertained. We need hardly repeat the benefits from industrial education. They are not too insignificant or too rarely useful to become fully apparent even when the people have made only a little progress in that kind of education.

---

Communicated

## THE EVILS OF THE PRESENT HINDOO SOCIETY AND THEIR CURE.

वऱ्हाड व नागपुर ह्या दोन प्रांतांत हजारों लोकांस गुण येत आहे. गुणा बद्दल खात्री इतकीच कीं, गुण न आल्यास किंमत परत देऊं. गुणाबद्दल पुष्कळ सर्टिफिकिटें आहेत, त्यांपैकीं कांहीं बाटली बरोबर असलेल्या माहितीच्या कागदांत दिलीं आहेत. दर बाटलीची किंमत ०९ आणे.

## खरजेवर मलम.

गुलाबी मुळींच झोंबत नाहीं. पांच चार दिवस लावल्यानें खरूज, फोड, आगपैण हीं खात्रीनें बरीं होतात. किंमत दर डबीस ०८ आणे.

## हींव तापावर गोळ्या.

कितीही दिवसांनीं येणारें हींव असो सुमारें १० अगर १२ गोळ्यांनीं बंद होतें. दर बाटलीची किंमत १२ आणे.

सूचना:—हीं सर्व औषधें अनुभवलेलीं आहेत सबब रोग्यांस अशी विनंती आहे कीं गरज पडेल तेव्हां ह्या औषधांचा अवश्य उपयोग करून पहावा. प्रत्येक औषधास बंगी खर्च ०१ आणा. बंगी नाटपेड, माहितीचा कागद बरोबर. हीं सर्व औषधें वऱ्हाडांत अकोलें येथें आमचे दवाखान्यांत रोख पैशानें अगर व्ह्या. पे. नें मिळतील.

कळावे. नारायण चिंतामण ठाकूर.

☞ हें पत्र आकोला येथें कै० वा० खंडेराव बाळाजी फडके यांचे "वऱ्हाडसमाचार" छापखान्यांत नारायण खंडेराव फडके यांनीं छापून प्रसिद्ध केलें.

किरकोळ अंकास .......... ८४
इल.
१० अं रु० १
...ळीस ० १०६
र खेपेस .... ०१

# वऱ्हाडसमाचार.

Advertisements
Below 10 lines...2Rs
Per line over 10..4as
Repetition perline3as

THE BERAR SAMACHAR.
VOLXXII AKOLA MONDAY 29 OCTOBER 1888 NO43
वर्ष २२ अकोला सामवार तारीख २९माहे आक्टोबर सन १८८८ इ० अंक ४३

## पत्रव्यवहार.

ह्या सदरा खालील मजकूर पत्रकर्त्यांच्या मतास मिळून असतील असें समजूं नये.

मुक्काम वाशिम ता.२३।१०।८८इ.

रा. रा. वऱ्हाडसमाचार कर्ते यांस

कृतानेक सा० नमस्कार विनंती विशेष पावसानें गाशा गुंडाळला असें खास वाटतें. कारण हल्लीं प्रातःकाळीं दंव पडूं लागला व थंडीही बरीच पडते. अजून पावसाची पिकांना जरूर आहे. व पाणी अजून विहिरींतून पुरेसें नाहीं तेंव्हां पुढें गती कशी होणार कोण जाणे. धान्याचे भाव माहाग होत चाललेले आहेत तेव्हां गरीबांचा पुढें परिणाम कसा लागणार हें कोणी तरी सांगू शकेल काय? ह्या जिल्ह्यांत फार करून गव्हाचा पेरा असतो. आतां गहूं पेरणीचे दिवस असून कित्येक ठिकाणीं जमिनी अगदीं कोरड्या होऊन गेल्या, कित्येक ठिकाणीं थोडा बहूत ओल आहे तेथें गव्हांचें पेरे चालले आहेत परंतु पुढें पाऊस न पडला तर पेरणीचें काम व्यर्थ जाऊन अग्नींत धान्य टाकिलें असतां जशी लाही होते तद्वत पेरलेल्या धान्याचा प्रकार होईल असो श्रीहरीची मर्जी जशी असेल त्या प्रमाणें गोष्टी घडावयाच्याच. मात्र गरीबांचे उदरपोषणार्थ सरकारानें (relief work) सुरूं केली पाहिजेत. आकोल्या पासून इंगोली पर्यंत आगगाडीचें काम लवकर सुरू होणार असें आपल्या पत्रीं मागें प्रसिद्ध झालें होतें परंतु आतां त्या संबंधीं कोठें कांहीं वार्ताही ऐकूं येत नाहीं. हें कसे आपल्या पत्रीं येणारी बातमी खोटी बहूवा नसावी असा लोकांचा समज असता असें असून हीच वार्ता आतां खोटी कां ठरूं पाहाते. गरीबांगोरिबांचें ह्या कामाकडे सध्यां डोळे लागून राहिले आहेत. कारण असा मोठा कारखाना सुरू झाल्यास कांहीं दिवस बिच्याऱ्यांचा चरितार्थ चालेल. तरी सरकार सांप्रत अडचणीकडे व दुरभिक्ष प्रसंगाकडे लक्ष्य देऊन भावी इंगोली आगगाडीचें काम सुरू करील काय? आगगाडी झाल्या पासून लोकांनां व सरकाराला अनेक प्रकारें फायदा होणार आहे

येथें श्रीबालासाहेबांचे देवस्थान फार नामांकित असून नवरात्राचा उत्साह फार चांगला होतो. ह्या उत्साहास प्रारंभ अश्वीन शुद्ध १ पासून होऊन अश्वीन वद्य १ पर्यंत चालतो रोज रात्रीं किर्तनें विश्वयोषितांची गाणीं, दिवसा पुराणें वगैरे प्रकार चालतात श्रोत्यांचा समुदाय बराच असतो. सायंकाळीं श्रींचिची पालखी निघत असते व गांवांत मिरवत असते अर्थात पालखी बरोबर वाद्यें असावयाचींच परंतु सालमजकुरीं ह्या गोष्टींत हो मुसलमान लोकांनीं हरकत आणीली व तो उत्साह जसा शेकडों वर्षांपासून चालत आला तसा ह्या वर्षीं झाला नाहीं ( म्हणज गांवात फिरण्याचा हो ) मुसलमान असें लाडके लाडके बोलतात कीं हिंदूनीं आमच्या मशीदींवरून वाजवित जाऊं नये परंतु हो शेंकडों वर्षें चालत आलेली चाल व हो हिंदुच्या धर्मांची बाब बंद होतें कशी असें त्यांना कसें समजत नाहीं कोण जाणे! कसेंही असो परंतु साल मजकूरी त्यांचा कल विचित्र दिसला तेव्हां सरकारापर्यंत ही गोष्ट जाऊन वाद्य वाजविण्यांत मात्र प्रतीबंद झाला व हल्लीं उभयपक्ष्यांच्या वहिवाटीच्या बाबतींत जबान्या सुरू आहेत. उभयपक्षांचे शेंकडों लोक नेमलेल्या दिवशीं कचेरीच्या दर्शनास जातात. व पुढें सरकार करील त्या प्रमाणें न्याय होणार. सोनारानें कान टोंचला म्हणजे जसा दुखवत नाहीं तद्वत ह्या लोकांचा प्रकार होणार आहे. उभय ही पक्ष ह्या देशांतले राहाणारे. पूर्वीं उभयतांनीं ही राज्यां दिकांचा उपभोग घेतला आहे परंतु काल मानानें उभयपक्ष अगदीं पादाक्रांत झाले इतकेच नाहीं तर हल्लीं उभयपक्षांतील बहुतांना माध्यान समयाची ही पंचाईत पडते. उभयपक्षांचें राज्य गेलें. नांव गेलें. डोकीबर मोळी आली तरी डोळे उघडत नसून विनाकारण धर्माच्या बाबतींत कई करून दुई माजऊन आपसांतील तंटे सरकारांत कां न्यावे हे आम्हास समजत नाहीं. परस्पर जातीनें आपापल्या धर्माप्रमाणें वागावें. परस्परानें आपापल्या धर्माप्रमाणें आपापलीं कामें करावीं. यांतच उभयपक्षांच्या मनुष्यांना भूषण आहे. मुसलमानांतील समंजस मनुष्य नाहींत काय? कीं सर्वच हेकेखोर आहेत. त्यांनीं आपलेच आग्रहांचे घोडे पुढें कां ढकलावें बरें? इलिचपुराप्रमाणें कांहीं प्रकार झाला असतां परंतु आमचे जिल्हाधीपती दूरदर्शी, हुशार असल्या कारणामुळें तसा प्रकार न होण्याबद्दल चांगला बंदोबस्त ठेविला होता. बाहेरील बाद्य वाजविण्याचा प्रकार वर ध्वनीत केल्या कारणानें चांगला झाला नाहीं. तरी इतर श्री बालासाहेबांचे मंदीरांतील उत्साह मामुलरीती प्रमाणें सर्वोत्कृष्ट झाला दसऱ्याचे दिवशीं दारुकाम पहाण्यासारखें सुटत असतें- हा प्रकार सिमोल्लंघन करून मंडळी परत आल्या वर श्री बाळासाहेबाचे मोठ्या दरवाज्या पुढें व त्याच्या आसमंत भागीं दारूचें काम सुटतें. हजारों लोकांची गर्दी पहाण्यासाठीं जमत असते, जिल्हाधीपती व इतर सरकारी मंडळीचा परिवार सर्व ही मौज पहाण्यास येतात. ह्या वर्षीं जुडिशिअल कमिशनर हो येथें होते. हो मोठी आनंद मानण्यासारखी गोष्ट होती. सर्व उत्सहामध्यें शुद्ध १३ दशीस मोठी पंगत होते. फार लांबून प्रसादा करितां लोक येतात. मागुन पुढून चार हजारांपर्यंत लोकांचा समुदाय जमतो पंगतीचा बेत बरा असतो. परंतु बंदोबस्त जरा अधीक पाहिजे. नाहीं तर वाढण्या करितां जी मंडळी पुढें सरसावते त्या मंडळीचे ज्यांचेकडे लक्ष्य असेल त्यांच्या पात्रांवर मात्र पदार्थांची रेलचेल होऊन जाते बाकीच्यांच्या पात्रांवर येऊन पोटभर खाण्यास मिळण्या करितां घसेच कोरडे करावे लागतात कारभारी मधून मधून जिकडे तिकडे फिरून "स्वस्त जेवा पाहिजे ते घ्या" अशी हात जोडून प्रार्थना करीत असत. त्यांचे हे ममतेचे शब्द ऐकून एक भुभुक्षीत ब्राह्मण ह्मणाला "महाहाराज तुमचें हें बोलणें ऐकून मजला फार आनंद होतो खरा परंतु पानावर कांहीं नसल्यामुळें काय जेवुं" असें ह्मणतांच प्रार्थना करणाऱ्या कारभाऱ्याना किती वाईट वाटले असेल. परंतु लागलींच त्यांनीं त्या भुभुक्षीत ब्राह्मणाची इच्छा तृप्त केली. पूर्वीं दंडे यांचे कारकीर्दीत बेत चांगला व बंदोबस्त उत्तम असें बहुत बोलतात परंतु आमचें असें मत आहे कीं, हल्लीं ही कारभारी चांगले आहेत. परंतु काळ तसा नाहीं ह्मणून कदाचित व्यवस्थेंत फरक जर असलाच तर असेल. परंतु त्यांनीं तरी काय करावें. लोकांचीं मनें वाईट होत चाललीं तेव्हां लोकांना गोष्टी वाईट दिसतील तर त्यांनीं तरी काय करावें. पंगतीच्या दिवशीं रात्रीचा प्रसंग असल्यामुळें वाढण्याची अंदाधुंदी व्हावयाचीच व वृतालपंख फुटावयाचच. एकटा कारभारी काय ह्मणून बिचारा पाहील. हो पंगत झाल्यावर ता० २० रोजीं गोपालकाला, ते दिवशीं मंदिरांत सुमारें ८ हजार लोक जमले असावे असा अदमास आहे.कारण आंतील सर्व स्थळ इतके गच्च भरले होते कीं, बोट शिरवण्यास ही जागा राहिली नव्हती. एकीकडे किर्तनाचा ध्वनीं चालला होता. लोकांची ओरड व जिकडे तिकडे प्रसादाची मिठाई वाटण्याची घाई सुरूं होती. जिल्हाधीपती व बंदोबस्ताधीपती व तालुकाधीपती यांच्या स्वाऱ्या आपापल्या हाताखालील मंडळीसह हा प्रेक्षणीय समारंभ पहण्यास आल्या होत्या. दिनास्ताचे वेळीं दध्यांडीचा देखावा पाहिल्यावर सदरहु बड्या मंडळीस पानसुपारी वाटली गेली. नंतर मंडळी व स्त्रीजन समुदाय आपापल्या घरीं गेल्यावर व जिकडे तिकडे गोंगाट कमी झाल्यावर गांवांतील शिष्ट सांप्रदायाप्रमाणें सभ्य मंडळीस नारळ वाटण्याचा समारंभ झाला. व रात्रीं बारावर एक वाजतां गोपाळकाल्याविषयर्थ भोजन पंगत झाली. हरदास, पुराणिक, वारांगणा, यांची संभावना झाली. व येणें प्रमाणें उत्साह समाप्त होऊन लोकांना आनंद झाला. श्री बाळासाहेब हा आमचे भूषण होय. हो मूर्ती इतकी सुंदर आहे कीं पाहिल्यावर मनुष्य कितीही नास्तिक असला तरी त्याचें तें नास्तिकत्व नाहींसें होऊन त्याचे मनांत अष्टभाव उत्पन्न झाल्या शिवाय रहावयाचें नाहीं. हें संस्थान स्थापन होऊन सुमारें १०९ वर्षें झालीं असें ह्मणतात. हें संस्थान जाहागिरीवर चाललें आहे. खानगी (देणग्या) फारशा येत नाहींत. वर्षांमध्यें सुमारें ३००० हजार येत असेल असें अनुमान आहे. ब्राह्मण, पाणके, कारभारी, कारकुन, पंच, वाजंत्री, चवघडा वगैरे सर्व गोष्टी असून फारच सुंदर व्यवस्था आहे. ही राखून धरणें हें मालकाचें काम आहे. वऱ्हाडवाशीं सर्व लोकांना आमची आपल्या पत्रद्वारें अशी विनंती आहे कीं अनुपमेय मूर्ती पाहिल्यावांचून त्यांनीं राहूं नये. व हा समारंभ दसऱ्याचे उत्साहांत पहावा.

मागील आठवड्यांत येथें मेहेरबान जुडिशियल कमिशनर साहेब बहादूर आपल्या क्लार्कसह येथें शेशना करितां आले होते. हे साहेब फार न्याई असल्यामुळें चौकशीचें काम फार बारकाईनें करितात. दोन शेशन केसीज होत्या. एक नाक कापल्यामुळें मयत झाल्याची व दुसरा आत्म बच्याव करित असतां मृत्यु घडल्याची. अर्थात ह्या दोन्ही केसीज पोलिसाकडून येऊन माजिस्त्रेटाकडून कमीट झाल्या होत्या. एकेक केस दोन दोन दिवस चालून उत्तम चौकशी अंतीं नाक कापण्याचे मुकदम्यांत कैदीला सात बर्षांची व दुसरे मुकदम्यांत एक वर्षाची अशा शिक्षा झाल्या. दोन्हीही मुकदमे खुनी होते. व न्यायाभाव झाला असतां तर गरीब बिचाऱ्या कैद्यांना कोणती शिक्षा झाली असती तर किती वाईट झालें असते. परंतु त्यांचें सुदैवच ह्मणावयाचें कीं त्यांना कर्नल बुलुक सारखे न्यायाधीश मिळाले. व आली होती जिवावर ती गेली शेंपटीवर अशी शिक्षा झाली. ज्या कैद्याला एक वर्षाची शिक्षा झाली त्यानें नागपुराहून मि. फ्रेझर या नांवाचे बॅरिस्टर आणिले होते. त्यांनीं जाण्या येण्याचा खर्च व एक दिवसाचे ५०० रुपये घेतले त्यांना येण्यास उशीर लागला ह्मणून आणखी एक मराठी वकील येथीलच त्यानें दोला होता.

रा. रा. बळवंत राजाराम कावळे यांचे येथें चोरी एका बाईनें केली. ह्या बाईचे त्यांचेकडे कामापरत्वें जाणें येणें असे असें ह्मणतात. चोरी झाल्यावर पोलिसानें ती चोरी पकडली व माजिस्त्रेटा पुढें त्या बाईची जबानी झाली तींत तिनें कबूल केल्या सारखे केलें आतां तो मुकदमा मि. सुरज नारायण यांचे पुढें चालला आहे तो बाई आतां भलतेंच ह्मणते व मी चोरी केली नाहीं तर मजला कामगारी बद्दल चोरींतील माल मिस्तर बळवंतराव यांणी दिला असें ह्मणते. आतां चोरींतील माल बराच असल्यामुळें इतका माल बाईला देण्या सारखी तिनें कोणती मोठी बाहादरीची कामगिरी बजाविली कोण जाणें विनाकारण एखाद्या मोठ्या मनुष्यांचें नांव बदनाम करणें आहे. ह्या बाईची ही स्वतांची बुद्धी नसावी कोणी तरी मिस्तर कावळे यांचे वैऱ्यांनें त्यांचे बदनाम व्हावें या हेतूनें तिला शिकविलें असावें असें लोक बोलतात. परंतु तो पोलिसाच्या ताब्यांत असतां तेथें

असें बोल असें तिला सांगण्यास कोण जाणार! खरें काय तें हरी जाणे! मात्र हा मुकदमा लोकांचा सध्यां चर्चा करण्याचा विषय बनला आहे. मात्र इतकें बरें आहे कीं तो मिस्तर सुरजनारायण न्यायमुर्ती यांचे पुढें चालला आहे तेव्हां यांत खरें काय आहे हे कोणाची भीड न मनांत आणतां खोबरें बाहेर काढतील अशी लोकांना पूर्ण आशा आहे मिस्तर कावळे पुसदास पुनः तहशिलदारीच्या कामावर गेले आहेत. तिकडे त्यांना ह्या बाबतींत विचारण्याकरितां बोलावणें गेलें आहे व मुकदमा ता० ३० पर्यंत तहकुब ठेविला आहे असें ह्मणतात. निकाल झाल्यावर कळवीन. परंतु मोठ्या मनुष्यांचे नांव बद्द होतें हे फार वाईट असल्यामुळें फारच वाईट वाटते. कळावें हे विनंती.

आपला
"क्ष"

वऱ्हाडसमाचार.

मिती आश्विन वद्य ९ शके १८१०.

## विनंती.

पुढील आठवड्यांत दिपवाळीचा मोठा सण आहे तर आमचे प्रिय वाचक सालाबाद प्रमाणें एक आठवडाभर सुटी देतील अशी पूर्ण आशा आहे. ह्मणून येत्या तारीख ५ रोजीं वर्तमानपत्राचा अंक निघणार नाहीं.

---

आलिशान रेसिडेंट साहेब बाहादूर यांची स्वारी गेल्या २६ वे तारखेस दोन प्रहरचे गाडीनें मुंबईहून येथें आली. त्यांच्या पेशवाई करतां, कर्नल स्पान्स्की, कामिशनर; कर्नल बुलक, जुडिशियल कमिशनर; कर्नल लेन, इन्स्पेक्टर जनरल आफ पोलीस; डाक्टर लिटल, सानिटरी कमिशनर; राव बाहादूर श्रीराम भिकाजी जटार, डायरेक्टर आफ पब्लिक इन्स्ट्रक्शन; कर्नल ग्रांट, डपुटी कमिशनर; आकोला; मि. आबर्ड, स्पेशल आसिस्टंट कामिशनर; डाक्टर मेरान, सिव्हिल सर्जन, आकोला; मि. निजामुद्दीन, असिस्टन्ट कमिशनर मि. प्राईस ए. अ. क.; रा० रा० गणेश श्रीकृष्ण खापरडे, ए. अ. क.; मुनिसिपालकमिटीचे व्हाईस प्रेसिडेंट, रा. रा. देवराव विनायक; मेंबर रा. रा. दत्तात्रय विष्णु भागवत, मौलवी हकीमुद्दीन आणि इतर; आणि गांवांतील संभावीत लोक, स्टेशनावर गेले होते. १२ वाजण्याचे सुमारास गाडी आली. साहेब बहादुरांची स्वारी गाडींतून उतरतांच त्यांचें कर्नल स्पान्स्की, कमिशनर, यांनीं स्वागत केलें; व स्टेशनचे पुढचे बाजुस त्यांचे सन्मानार्थ पलटणीची एक कंपनी उभी केली होती तिनें बाद्य वाजविलें. नंतर स्टेशनांतून बाहेर येऊन, तेथें गाडी तयार ठेविली होती तींत ते व कमिशनर साहेब बसून सर्किट हाऊस मध्यें उतरण्याची सोय केली होती तेथें गेले. वाटेंत स्टेशनचे फाटकाजवळ संकेताप्रमाणें मुनसिपालकमिटीनें त्यांचा अमदीं थोडक्यांत सन्मान करून स्वागत केलें. स्टेशन पासून उतरण्याचे जागेपर्यंत शोभे करितां रस्त्याचे दोन्ही बाजूंनीं ठिकठिकाणीं केळीचे खांब, व निरनिराळ्या रंगाचीं निशाणें लावलीं होतीं व बंदोबस्ता करितां पोलिस उभे केले होते.

दुसरे दिवशीं सकाळीं गांवच्या लोकांच्या तर्फेनें म्युनिसिपाल कमिटीनें साहेब बहादुरांस टाऊनहालांत पानसुपारीस बोलाविलें. ह्या समारंभास समाज बराच मोठा होता. तेथे कमिटीचे व्हाईसप्रेसिडेंट रावसाहेब देवराव विनायक यांनीं थोडेसें भाषण करून शहरची स्थिती साहेब बाहादुरांस कळविली भाषणाचा गोषवारा आमच्या वाचकाकरितां आह्मी दुसरीकडे इंग्रजींत दिला आहे ते भाषण झाल्यावर साहेब बाहादुरांनीं छोटेसें समयोचित भाषण केलें व नंतर हा पानसुपारीचा प्रसंग आटोपला. रेसिडेंट साहेबांनीं आपल्या भाषणांत, कमिटीनें त्यांचे नजरेस आणलेल्या गोष्टी संबधानें, आपल्या हातून होईल तितकें करण्याचें अश्वासन दिले, व आह्मी पुढें लवकरच पुन्हा येणार आहोंत त्या वेळीं प्रत्यक्ष गोष्टीकडे विशेष लक्ष्यपूर्वक पाहूं ह्मणून ह्मटलें; नंतर संध्याकाळीं गांव व धर्मार्थ दवाखाना पाहिला. काल रोजीं साहेब बहादूरांची स्वारी दोन प्रहरचे गाडीनें उमरावतीस गेली. बरोबर त्यांचे मिलिटरी सेक्रेटरी, मेजर गिलकिस्त, व क्लार्क आफ कोर्ट, रा. रा. बंधुजी जनार्दन हे आहेत.

रेसिडेंट साहेबांचा इकडे येण्याचा हेतु काय आहे हें अद्याप बाहेर आलें नाहीं. प्रांत पाहून प्रजाजनांचीं सुखदुःखें ऐकावीं व दुःखाचे निवार्णार्थ ते सुचवितील ते, अथवा आपणास सुचतील ते उपाय योजण्याची वरिष्ट सरकारांकडे शिफारस करावी; राज्य कारभार संबंधीं कांहीं व्यंगें नजरेस येतील तीं दूर करावीं; वेळोवेळीं वरीष्ट सरकारां कडून आलेलें व आपण पाठविलेलें हुकुम सरकारच्या समजुती प्रमाणें व इच्छे प्रमाणें शद्बशः अमलांत आले आहेत किंवा कसें; वगैरे जे स्थानिक सरकारचे फिरावयास निघण्याचे हेतु तेच ह्या रेसिडेंट साहेबांच्या येण्याचे असावे असें ह्मणावें तर त्यांचा प्रांतांतील आगदीं थोडे ठिकाणीं मुक्काम होणार व तोही ह्मणण्या सारखा पुष्कळ काळ पर्यंत व्हावयाचा नाहीं ह्या, वरून तसे ह्मणतां येत नाहीं. तेव्हां हेतु काय असेल तो असो.

---

मृत्युः--आमचे मित्र रा रा. सी. पी. लक्ष्मापति नायडू ब्यारिस्टर ॲट लॉ यांस गेल्या ता. १२ रोजीं मद्रासे कडेस श्रीरंगम येथें bronchitis च्या आजारानें देवाज्ञा झाल्याचे ऐकून आह्मास फार वाईट वाटतें. रा. लक्ष्मीपति हे पुष्कळ वर्षे वराडांत, कांहीं काळ अकोल्यास व नंतर उमरावतीस. आपला धंदा चांगल्या रितीनें चालवीत होतें हें इंग्लिश फार अस्खलित बोलत व ती भाषा लिहिण्यांतही ते मोठे पटाईत होतें हे बरींच वर्षे विलायेंततही होतें!

---

"डाका येथील म्युनिसिपालिटीनें लेफ० गव्हरनरांस सन्मान देण्यासाठीं शहरांत रोषणाई वगैरे करण्यांत पैसा खर्चिला तो गैरे कायदा खार्चला, याबद्दल कमिटीवर किस्येकांनीं फिर्याद आणिली होती. तेथील मुनसफांनीं एक वर्षांपूर्वीं कामेटी विरुद्ध निवाडा दिला होता पण डि. जज्जानें तो नुकताच "फिरविला." हलवायाच्या बरावर फात्या पाडण्यास डि. जज्जाचे काय पदरचे खर्च होत. अगोदर सर्व प्रकारें लोक करानें नागविले जातात आणि सन्माना करितां आपल्यांतलेंच पुढें नाचणारे विनाकारण अशा गोष्टी पोकळ थोरवी करितां करितात. आणि लोकांचा पैसा खर्चीं घालतात, यांतच थोरवणा काय? लोक अन्नावांचून उपाशीं मरतात ते पहाणार कोण! असें ह्मटलें तर राग मात्र पोटभर येतो. तर राग न करितां खरें काय ते पाहून करावें उगिच भुलुं नये.

---

# The Berar Samachar

MONDAY OCTOBER
29, 1888.

---

### OURSELVES.

We request our subscribers wil allow us the usual Dewali Holidays which they have hitherto done ungrudingly. As our office wiil be closed for the holidays there will be no paper issued next week.

---

### OUR SATTA TRADE.

Our Satta trade in Berar is a thing not quite peculiar to this province. It is a kind of speculation the like of which is the opium speculation in Calcutta and Bombay, The love of unprecedented gain without any particular trouble, which is one of the chief absorbing elements of human nature lies at the root of all speculative trades People are naturally tempted to go in for a trade which may bring to them thousands, if they are so lucky as to hit at the right thing.

But what after all is this satta trade one may ask. Paper representing a contract between two parties to sell or buy so many bogahs of cotton or so many candies of wheat, jowari linseed, cottonseed &c. on a day certain named in the contract at a certain prices represents what they call a satta. Of course it is all a bogus transaction never intended to be literally carried into effect by the actual delivery of the thing stipulated for at the appointed time, though in some cases delivery is as a matter of fact, made. There is nothing in outward appearance to distinguish the Satta paper from ordinary *bonafide* contracts duly executed in writing. Formerly there used to be no initial payment but the dealers in Satta have added on an element of part payment to the transaction so as to give it an appearance of a genuine contract. On the day named in the contract for delivery, there is an explicit or quasi— explicit understanding between the parties, that no goods are to be given and taken but only the difference in the prices settled in the contract represented by the original sattas and the rates fixed by a 'Punch' selected from among the Satta dealers. This Satta has a limited or unlimited sphere of currency according to the credit of those who issue them. For instance, at Amraoti which is the chief seat of this Satta trade, only ten or a dozen people can write sattas which can be freely circulated in the market like bills of exchange drawn by respectable firms. At Khamgaon however the Sättas are not negotiable, but each dealer has to pass on a new Satta to the next purchaser. There are various kinds of these sattas which we mean to deal with some other time; the above we believe, will give pretty correctly an idea about Satta trade to one who is a stranger to the trade.

Today we only mean to deal with one point regarding Sattas; viz how far reaching and pernicious are the effects of this Satta trade that the original intention in almost all cases is not a bona fide one of taking or giving actual delivery will appear from the fact that dealings in Sattas go on to the etxent of lacs and crores of candies of goods, perhaps a hundred times the actual out turn of corn of the whole province. A person dealing in sattas to the extent of some thousands of candies cannot presumably have any intention of fulfilling the contract by actual delivery. Especially when the dealers in sattas are not exporters of the corn and other goods they contract for, the only explanation of their dealings is, that they do it as a speculation, pure and simple. Persons from inside the province as well as from outside the province deal largely in sattas through their Adtiás and brokers. The extent to which outsiders deal in Sattas would be well shown by the amount of wining that goes on; indeed it would be curious to quote and compare the number of commercial satta telegrams of a certain year with that of four or five years back. From the Central Provinces from Marwad and Bombay there are telegrams that purport to buy or sell thousands of cotton bogas and as many candies of corn &c. But the trade is not only taken up by these higher dealers, chiefly of the Marwadi class, alone; the effects of this Satta trade go home to the lowest ryot in Berar. Puny Marwaris who have to make their fortunes ply on this trade even in the villages. When the ryot requires monies for expenses of cultivation, the shrewd Marwadi is ready to offer him the money only if the ryot is willing to make a 'Làgwan' or a contract to deliver goods at harvest time at a certain rate which is generally much lower than the rate at which the rate is likely to bè at harvest time. The Marwadi is always a better hand at making forecasts of the rates likely to be current at härvest time especially as he is in touch with the Marwadis of some big city, where the pulse of the Satta trade is really beating. If the ryot gets a good

[..]st and is able to make his de-[..] of cotton] or jowari or wheat he is worsed, because he has already bound himself to deliver at rates much lower than rates current at or about the time of delivery of goods. If unfortunately, the ryot loses the crops, there is our Indian Shylock ready to make up a fancy account at current rates, of goods not delivered, and down goes an acknowledgment of the ryot's liability for so much in the Marwari's books to be neatly used in a law suit. These petty Marwaris in their turn deal in Satta transactions with the Satta dealers in big cities and thus the influence of this Satta trade reaches in all its noxious ramifications to the village ryot. The whole province is like a net work with so many 'catchers' to pull in the victims. On account of this systematic contracts for delivery of goods many a kunbi family in berar has become homeless and destitute. The effects of this Satta trade however, are very pernicious on the general condition of trade. Satta trade is really no genuine trade at all; it does not bring any real profit on the whole but is only a device to enrich one at the expense of another it does not give any increased facilities to the export or import of goods; in fact no useful end is served by the dealers such as is the case with those who actually deal in the transport of grain &c.

So much energy of these dealers is simply wasted by being carried into a wrong channel. If the same amount or even half of it were spent on some kind of productive labour, say for instance, cotton weaving and spinning or oil-mils, the country would be so much the richer; it will have actually gained so much by increasing the utility of these articles of local production. If the capital employed in this trade were employed in some form of productive industry, the advantages to trade would be enormous. Indeed it is a pity that a province so fertile as berar is full of promise as to its capacities for increase of trade and possessing within itself all the raw material ready to hand, should be as yet so backward in manufacturing industries. All this lethargy is ascribable to the existence of this stupid satta trade, which is such a tempting evil that it diverts the attention of sowcars from their legitimate functions as capitalists.

The trade is like a false appetite created by a stimulant; when the latter disappears, the appetite vanishes as well. But the man who has a genuine appetite will value as nought a false appetite, and so it the sowcars here once realize the value of entering upon manufacturing pursuits they will see reason to change their mind and stop the satta trade. The great difficulty, however, is how to accomplish this end. We can only point our finger to Government interference as the remedy for driving this trade out of market and we shall state hereafter on what lines we would like to see the Government take action in the matter.

---

The half yearly Examination of the Hospital Assistants was held here on the 25th, Instant. The Examination board consisted of Doctor Little as President and Surgeon Moran member.

The following Hospital Assistants were declared passed by the board.

| | |
|---|---|
| G. P. D'Souza | First Class. |
| M. Doorgaiah Pillay | Do. |
| Amir Oollah Khan | Do. |
| | (in English only) |
| Syed Survar | 2nd Class. |
| Mahomed Sheriff | Do. |

Many of the Hospital Assistants were entertained on Rs, 60 per month and by their passing for the higher grade they gain nothing therefore we would suggest for the kind consideration of the Sanitary Commissioner who has the interest of his subordinates at his heart, that some of the old hands be given the senior grades as done in the Military Department and thereby give the deserving hands some sort of promotion and encouragement to the present old hands and inducement to others to take interest in their work.

---

The Resident in company with the Commissioner and Deputy Commissioner visited the Charitable Dispensary on saturday evening and was satisfied with what he saw.

The following was said by Rao Saheb Deorao Vinayak, Vice President of our Municipality, in the meeting held in town hall on the morning of the 27th, instant for the reception of the Resident:—

On behalf of the people of this town [..], the members of the Akola Municipality, offer you, the highest local representative of our Sovereign Empress, our most hearty welcome.

The more we see of the Empress's rule, the more convinced we become that all our higher interests depend on the continuance of the British Rule in India; and we assure you that at the present moment all those people, who can think and understand, are actuated by one common feeling viz loyalty and attachment to the British Throne.

2. The wise advice given by you at the conclusion of your remarks on the *last* report about the Municipal administration in this Province, is in every line of it so full of sympathy for our welfare that whoever reads it cannot but feel grateful that he is placed under the care of so kind and benevolent a ruler. We promise you that it shall be our earnest [..] constant endeavour as members of the [..]unicipality faithfully to perform the duties which you have enumerated in such beautiful and at the same time clear and definite language.

3. In more recent years, several measures have been adopted by our Committee for improving the health of the town. It is not for us to say what success has attended our humble efforts. It must be admitted that the general mass of the people are very conservative in their habits, and no measures adopted by the Municipality, with its poor income, can effect any large and permanent improvement, unless Government give us their helping hand. How poor the people of this town are may be gathered from the fact that only 1,822 persons or about 10 per cent of the total population are in a condition to pay the Town Fund Tax, which is levied from all persons whose annual income is not less than 100 rupees. Of these 1,822 persons who pay the tax, the income of no less than 1,525, or the greater majority, does not exceed 500 rupees a year or 40 rupees a month. Under these circumstances the help of Government is urgently required in supplying the town with pure and healthy water. The correspondence on this subject is at present before you and we are anxiously waiting for your favourable decision.

4. The town boasts of no industries for the manufacture of articles of export. Government have recently sanctioned a monthly grant of 227 rupees for the opening of industrial classes in this town and we hope that this will afford some assistance to the revival of industries.

5. In every thing we [h]ave been doing, we have received the most cordial assistance from our Presidents, the Deputy Commissioners, and all those Government officers whose duties brought them in contact with us. We have been invariably treated with the utmost courtesy by these officers and we feel no doubt that the same encouragement, assistance and good treatment will be continued to us and our successors.

6. In conclusion, we repeat our sentiments of sincere attachment to the Queen Empress and wish that God may bless Her Majesty and yourself with a long and happy life.

---

Ellichpur *Berar*
24 th October 1888

To
The Editor "Berar Samachar"
Akola

please insert the following lines in the next issue of your valuable journal.

Rural Boards Election.- The day has at last come when we are to elect members to serve on the Rural Board on our behalf under the new Law and we must certainly thank Captain Morris our present Deputy Commissioner for this fortunate and memorable day. On 22 nd October the Court of the Deputy Commissioner was througed with villagers of the Ellichpur Taluk. The people were in great hurry to elect members on their behalf. It is to be noted that each Kunbi who had a right to vote, had got a slip of paper which contained 2 names of persons whom he elected to serve as members and at the foot; the voter had his own signature. I happened to ask a voter "what this paper was" he answered "It contains the names of 2 persons of his own village whom he wished to elect as members and that it is to be given to the *Sahib*, but he said he di[..] [n]ot know why these 2 persons were wanted. From this I conclude that the people did not understand what the Rural Boards Law is. This state of affairs is to be regretted and we must blame ourselves alone for this. Government gives us our rights but if we will not try to know what those rights are, who is to be blamed for this? It was the duty of Amraoti Sarvajanik Sabha to enlighten the minds of the public on the subject of Rural Boards Law. Only one lecture was delivered by one member of the Sarvajanik Sabha here some months ago, but that was not sufficient to accomplish the objects. The members ought to have gone to villages and make villagers familiar with the Law. Now *done is done* and it is therefor expected that Sabha will not fail in its duty next year at least.

*National Congress.* There was a big meeting held on 23rd October 1888 in the Navabs Palace of Ellichpur. More than 1000 people had assembled. The chair was occupied by Mr. Amjut Hussen Khatib Sahib Special Magistrate Ellichpur. Mr. Padurang Govind Vakil, who had specially come from Amraoti delivered a fine lecture in Urdu on the subject of National Congress. The lecturer dwelt at length upon the aims and objects of the National Congress and impressed upon the minds of the public the necessity of joining the congress and forming a committee here to carry out the aims and objects of the congress. Other speakers spoke and hotly discussed the congress question and it was at last unanimously resolved that a committee should be formed to carry out the objects of the congress. President, Vice President Secretaries were then elected. These delegates Messers Gunesh Nagesh Vakil, Narayen Rao K. Deshpande Hon. Magistrate and M. V. Joshi L. L. B. of Amraoti were elected as delegates of this District to be present at the ensuing Congress to be held at Allahabad. The Chairman made a fine short speech in which he approved of what was said by Mr. Pandurang Govind and regretted that Sir Sayed Ahmed should be against the movement of the National Congress. Great enthusiasm prevailed at the meeting. National Congress books and leaflets were freely distributed to the public. A vote of thanks to the chairman brought the proceedings to a close.

your truly
"X"

---

## वऱ्हाड

पर्जन्य एकदां तरी पाहिजे व त्याची चिन्हेंही दिसत आहेत पण अद्याप पडत नाहीं. थंडीही म्हणण्यासारखी नाहीं.

मि. हाविल सा० रेसिडेंट यांची स्वारी कालरोजी येथुन दोनप्रहरचे गाडीनें उमरावतीस गेली; तेथें दोन दिवस मुक्काम करून पुढें ३० तारखेस एलिचपुरास जाऊन १ त्या तारखेस चिखलद्र्यास जाणार तेथें साहेब बहादुरांचा आठदिवस मुक्काम होणार म्हणून म्हणतात.

कर्नल फिट्झलेड, दि. क. यांनीं आणखी सहा महिन्याची रजा घेतली म्हणून म्हणतात.

कर्नल ग्रांट साहेब गेले आठवड्यांत रजेवरून परत येऊन आपले येथील डे. क. जागीं रुजु झाले. मि. आवर्ड, स्पे. अ. क. चे कामावर व मि. निजामुद्दीन अ. क. हे स्मालकाज कोर्टाचे जजाचे कामावर परत गेले. रा. रा. गणपतराव खापरडे ए. अ. क. यांची नेमणूक बदनेऱ्यास झाली असें म्हणतात.

मि. किंग, ए. अ. क., यांची कटा येथें ५०० रु० वर ए. अ. क. चे जागी नेमणूक झाली व ते त्या प्रमाणें तिकडे लवलरच जाणार.

वऱ्हाड सार्वजनिक सभा आलिशान रेसिडेंट साहेबांस मानपत्र देणार आहे.

कर्नल लन रजेवरून परत आल्या मुळें मी० राईट अकोलें डि० सु० चे जागीं रुजू झाले; व मि. काटग्रेव्ह बुलढाण्यास गेले.

कर्नल गंथार्प डि. सु. पो. रजेवरून उमरावतीस परत आले.

क्या. मारीस डे. क. इलिचपुर हे तीन आठवड्यांचे रजेवर जाणार आहेत

मि० आर्देसर ए० अ० क० हे रजेवरून परत आल्यामुळें मि० सफदरअली त्यांचे कामावर मोर्शीस गेले होते ते परत येथें येऊन मुर्तिजापुरास आपले कामावर गेले.

रा० रा० श्रीकृष्ण नरहर ए. अ. क. तेल्हारे वै मि. माणिकशा ए. अ. क. खामगांव हे रेसिडेंट साहेबाचे मुलाकतीकरितां येथें आले होते.

---

## वर्तमानसार.

..८८
[..]णि श्रीधर
[..]र सेक्रेटरी शिक्ष-
[..] समाज प्रांत वऱ्हाड.

मध्यप्रदेशच्या विद्याखात्याचे इन्स्पेक्टर जनरल ह्यांनीं व जु. क. साहेबांनीं यापुढें तिकडील वकीलीचे परीक्षेकरितां एफ ए. पास झालेले विद्यार्थीच फक्त घेतले जावे अशा विषयीं मे' चीफ कमिशनर साहेबांस शिफारस केली आहे.

रत्नागिरी येथें कांहीं मंडळी मिळून त्यांनीं सतरंज्या व कोटाचे जाडे कपडे काढण्याचा लहानसा कारखाना गांवांत सुरू केला आहे.

पुण्याच्या प्रदर्शनांत एक चमत्कारिक चित्र आलें आहे. तें समोरून पाहिलें तर सिंहाचें दिसतें. एका बाजूनें पाहिलें तर हत्तीचें दिसतें. व दुसऱ्या बाजूने पाहिलें तर घोड्याचें दिसतें.

अबकारी कायदा—मुंबई शहर शिवाय करून इलाख्याचे कोणतेही भागांत माजिस्त्रेट समोर एकदा अबकारी गुन्हा चालला असतां, गुन्हेगारास केलेला दंड त्या खटल्यांत बहादरी केलेल्या इसमास, अंशतः किंवा सगळा देण्याची सरकारानें परवानगी दिली आहे.

कुरुक्षेत्रांत जेव्हां अद्वितीय रणकंदन झालें त्यावेळेस जसें ग्रहांचे योग आले होते, तसेच योग येत्या नवंबरचे चवथ्या तारखेस आले आहेत, असें काशींतील आणि बंगाल्यांतील ज्योतिष्यांनीं जीं भविष्यें वर्तविलीं आहेत त्यावरून दिसतें. या सर्वांच्या मतें त्या दिवसा पासून सर्व देशभर दुष्काळ पडेल, रक्तस्रावाच्या लढाया होतील, महाभयंकर रोग उद्भवतील व प्रचंड झंझावातांनी देशाचे बरेच भाग उद्ध्वस्त होतील असें आहे.

अमेरिकेंत तीन स्त्रियांना सर्व देशांत पत्रें फुकट पाठविण्याची परवानगी आहे. काय बरें यांनीं एवढें देशाचें हित केलें असेल!

पर्जन्याच्या कमताईमुळें निजामाच्या राज्यांत मोठा दुष्काळ पडण्याची भीति वाटूं लागली आहे.

सस्पिंड केलें श्री० रा० विनायक रंगराव उर्फ बाबासाहेब पुरंदरे डेप्युटी कलेक्टर बारवाड यांस काफर्ड प्रकरणाच्या संबंधानें सस्पिंड केल्याचें ऐकतों. क० त०

अफगाणिस्थानांत गिलजीच्या सभोंवती दंगा ऊत्पन्न झाला म्हणून वर्तमान आहे.

इंग्लंडचा मध्य युरोपांतील सरकारांशा संबंध सुटावा म्हणून इंग्लंडशी व रशियाची दोस्ती वाढवावी असें रशियांतील वर्तमान पत्रें सूचवीत आहेत. सु० प०

येत्या मुनसफीच्या व वकिलीच्या परीक्षेची तारीख ४थी मार्च १८८९ नेमिली आहे.

विलायतेस नुकतीच एक व्यापारी सभा भरली होती तिचे अध्यक्ष कर्नल सर चार्लस उईल्सन यांच्या तोंडून सहजगत्या असे उद्गार निघाले कीं, मूळ ठिकाणाहून कापूस आणून येथें त्याच्या चिजा करून विकावयास पाठविण्यांत अगदींच फायदा नाहीं असा स्पष्ट अनुभव येत आहे. इंग्रज लोकांनीं असते आसते सर्व कारखानें आमच्या देशांत घातले तर त्यांचे व आमचे उभयतांचे ही हीत होईल.

कापसाचा पेरा— मुंबई इलाख्यांत या मोसमांत कोण कोणत्या जगांत कापसाचा पेरा आहे याचें टिपणः—

डेक्कन ९ १/२ लक्ष एकर; कर्नाटक ९ लक्ष एकर; गुजराथ ६ १/२ लक्ष एकर; कच्छ १ १/४ लक्ष एकर; काटेवाड ४ १/२ लक्ष एकर; बडोदें ३ ३/४ लक्ष एकर; सिंध ६३ हजार एकर; आणि सर्दन मराठा स्टेट्स् ९४ हजार एकर.

क्षणांत कुबेर— युनायटेड स्टेटस् मध्यें व्हेसेलीस येथल्या छापखान्यांत एक खिळे जुळणारा आहे त्यानें एम. टाउसायट या पूर्वींच्या एका प्रिंटरचा जीव वांचविला होता एम. टाउसायट हा पुढें मोठा श्रीमान झाला. पण त्यास पोरबाळ कांहीं नव्हतें. म्हणू मरतांना १० लक्ष पौंडाची आपली मिळगी त्या खिळे जुळणाराच्या नांवानें करून दिली याचें नांव दैवयोग.

दांत कोरण्याच्या काड्या— व्यापाराचें अणुरेणू एवढें द्वार ही गोरे लोक फुकट जाऊं देत नाहींत. इतकी उद्योगाची त्यांची शिकस्त आहे हें पुढील गोष्टीवरून नामी स्पष्ट होतें. अमेरिकेंत हार्बरस्प्रिंग या ठिकाणीं दांत कोरण्याच्या काड्या तयार करण्याचा एक मोठा कारखाना आहे. व्हाइटवर्च याझाडाच्या या काड्या करितात. या कारखान्यांत दररोज ७ १/२ लक्ष काड्या तयार होतात. हे लांकूड गोड असते. १ १/२ पैशास ३०० इतक्या सस्त्या या काड्या किरकोळ दुकानी विकतात. हा कारखाना अतिशय भरभराटींत आहे. उद्योग्याचे घरीं ऋद्धी, सिद्धी, पाणी भरी' अशी म्हण आहे ती कांहीं खोटी नव्हे.

अजस्र घड्याळ— ग्लासगो युनिव्हर्सिटीसाठीं एक घड्याळ केलें आहे त्याचें वजन २ १/२ टण म्हणजे सुमारें ९ १/२ खंडी आहे. याची फ्रेम ओतींव लोखंडाची आहे. त्याची लांबी ६ १/२ रुंदी २ व जाडी १ १/२ फूट आहे. तें लोखंडी तुळवटावर ठेविलेलें आहे. याची चक्रें तोफेच्या धातूचीं आहेत. ठोका मारण्यास आणि पावतासास गती देणाऱ्या चक्रांचा व्यास २० इंच आहे ठोक्याचा घण उचलण्याचे त्यांसच जोडले आहेत. घणाचें वजन १२० पौंड व लंबकाचे खालच्या गोळ्याचें वजन ३ हंड्रेडवेट आहे. कवढें घड्याळ हे!! शु० स०

लाहोर येथील सरकारी खजिन्यांतून दोन लक्ष रुपये ब्लॅकमाउन्टन एक्सपिडिशन करितां पाठविण्यांत आले.

कोंकण डिविजन पैकीं पेणचे पोष्टमास्तर मि. सखाराम सिताराम वैद्य, पवार रु० ३० व अलीबाग टेलिग्राफ हपिसांतील सिग्नलर मि. त्रिविक्रम रामकृष्ण आठल्ये पगार रू० २० यांस ब्रह्मदेशांत टेलिग्राफ हपिसांत अनुक्रमें ६० व ५० रुपयांवर नेमिले व तिकडे ते जाण्यास कबूल आहेत असें समजतें. ज० मि०

मुन्सफीची व वकिलीची परिक्षा ४ मार्च १८८९ रोजीं मुंबईस सुरू होईल.

मुंबई इलाख्यांतील नेटिव संस्थानांत वकिली करूं इच्छिणारांची हायकोर्टामार्फत एक वेगळी परिक्षा सुरू होणार आहे.

एल. सी. इ. पास होणाऱ्या पहिल्या तिघांस नोकऱ्या देण्याची जरी हमी नाहीं तरी ओवर सबर्डिनेटच्या ज्या जागा रिकाम्या होतील त्या होता होईपर्यंत एल. सी. इ. पास होणाऱ्यांसच देण्याचा सरकारचा विचार आहे. ठा० अ०

— मद्रासेला एक ट्रामवे कंपनी स्थापन झाली आहे.

विझिगपटम या शहरीं दिवसें दिवस धान्य महागत चालले म्हणून व्यापाऱ्यावर रागावून तेथील लोकांनीं धान्याच्या अड्ड्यावर जाऊन गर्दी केली त्यांत धान्यांचीं ३०० पोतीं लुटून पार झालीं शांतता ठेवण्यास्तव तेथील कलेक्टरानें पोलिसांत आणखी ५० शिपायांची भरती केली आहे.

—हिंदुस्थानचे स्थितीबद्दल पार्लमेंट सभे मध्यें भाषण करतांना ब्याडला साहेब म्हणाले कीं हिंदुस्थानांत हंगामाचे दिवसांत गरीब मजूर लोकांस २ आणे रोजीं मिळाली म्हणजे फार झाली एकंदर लोकवस्तीचे मानानें वार्षिक उत्पन्न २७ रुपये हिंदुस्थानांत प्रमाण पडतें. व येथें ४७० रुपये प्रमाण पडतें. गेले बारा वर्षांत हिंदुस्थानांत केवळ अन्नावांचून १२०२६४२० मनुष्यें उपासमार होऊन मरण पावली. तरी सरकार दिवसेंदिवस त्या देशावर कराचें ओझें लादीतच आहेत व ते लोक ही मुकाट्यानें ते सर्व सहन करितात ही गोष्ट उभयपक्षांस मोठी लज्जास्पद आहे.

— पोरांचे लाथाळें— एका बंगाली पत्रावरून समजतें कीं, एका ११ वर्षांच्या मुसलमान जातीच्या मुलानें ६ वर्षांच्या मुलीवर बलात्कार केल्या वरून त्याची सेशन कोर्टांत चौकशी होऊन त्याला एक महिन्याची साधी कैद, व पुढें पांच वर्षे पर्यंत कलकत्ता येथील रिफॉर्मेटरी यास या प्रमाणें शिक्षा झाली. या प्रकरणांत साक्षी तीन; एक ती मुलगी, तिचा आठ वर्षांचा भाऊ, व त्या मुलीला तपासणारा डाक्टर ! ! ! सर्वच गोंधळ ! ! !

हिंदुस्थानांत एकंदर ७४१ मोठें तुरुंग आहेत त्यांतील कैद्यापासून गेले सालांत दीड लक्ष रुपये फायदा सरकारास झाला. न्या० सिं०

नेटीव पत्रें विकत घेतलेले मारेकरी असून भोपाळचा नबाब दरोडेखोर असून तो इंग्रजी राज्य नष्ट करण्याचा प्रयत्न करीत आहे असें भोपाळचे माजी दिग्विजयी एजंट सर ग्रिफिन यांणी इंग्रजी पत्रांत प्रसिद्ध केलें आहे एकदा मनुष्य निर्भिड झाला म्हणजे तो बडबड फार करतो अशी आमच्यांत एक म्हण आहे त्या प्रमाणें सर ग्रिफिनची स्थिती झाली आहे या नेटीव पत्रांवर फिर्याद करण्यास सरकार परवानगी देत नाही आणि तो सरकाराने देणेही वाजवी नाहीं, आणि त्या नबाबाची सरकार खोडही मोडीत नाहीं म्हणून ग्रिफिनने वरील मार्ग धरला आहे या बडबडीपासून कांहीं एक निष्पन्न व्हावयाचें नाहीं मात्र उलट त्या सर्व खटल्याची सरकार अधीक जास्त बारीक रितीनें चवकशी करील.

अमेरिकेंत कापसाचें पीक यंदा चांगलें नाहीं. शेंकडा ७८ पीक होईल असें म्हणतात. अतिशय पाऊस पडल्यामुळें पिकाचीं नासाडी झाली असें म्हणतात. आमच्या इकडे तर ८४ आणेही पीक मिळण्याचें कठीणच आहे.

मुंबई व्यांकेचा व्याजाचा दर वाढला आहे म्हणजे ७ टक्के झाला आहे.

स्त्रीचा उपमर्द करण्याचा एक मासला नुकताच कांडी येथील कोडतांत झाला. फिर्यादी स्त्रीच्या गुरांनी आरोपीचें शेत खाल्लें म्हणून त्याचा सूड उगविण्याकरतां आरोपी हा त्या फिर्यादी स्त्रीस खालीं पाडून तिच्या डोक्यावर बसला. असें डोक्यावर बसणें हे ३४५ कलमा खालीं येत नाहीं कारण तो तिच्या डोक्यावर बसला पण दुसरा कांहीं प्रकार केला नाहीं अशी तकरार करण्यांत आली तरी जज्जानें आरोपीस सहा महिने शिक्षा दिलीच. ठा० अ०

मुंबईतील एका निरोद्योगी मनुष्यानें आपल्या बोटांतील आंगठी आपल्या शरीराच्या गुह्य भागांत अडकाविल्यामुळें त्याचा प्राण जाण्याची वेळ आली होती इतक्यांत त्यांस इस्पितळांत नेऊन त्याची सुटका केली असें तेलगूमित्रास एकजण लिहितो! पु० वे०



## फुकट ! ! !

"आर्य" नांवाचें ( त्रुर्त )त्रैमासिक पुस्तक येत्या जानेवारी सन ( १८८९ ) पासून 'आर्यहितचिंतक मंडळी' कडून निघणार आहे. यांस पांचशें प्रतीपर्यंत वर्गणीदार होतील, त्यांस हें फुकट मिळेल. पुढें होणारास वर्षाची वर्गणी टपालसह ८ आणे पडेल. फुकट मिळेल त्यांस व या मंडळीच्या सभासदांस टपाल २ आणे पडेल.

पत्ता—मुंबई, नवा नागपाडा, नं. १६० "औषधालय"

आर्यहितचिंतक मंडळीचे चिटणीस.



UNDER SECTION 287 OF
ACT XIV OF 1888
CIVIL SUIT NO: 134 OF 1888
MISCELLANEOUS CASE
NO:- 271 OF 1888

NAWAROJI WALAD SHAPURJI
SANJANA OF AKOLA Dec: Hol:
VERSUS
MR C. S. LIEN OF AKOLA Jt. DR.
CLAIM RS 151-6 0.

Whereas in the course of Execution proceedings held at the instance of the above mentioned Decree Holder, moveable property has been attached and it is necessary to enquire whether the said moveable property belongs to you alone, or there is some one else interested in it, you are hereby summoned to appear personally or by pleader on 10 th November 1888 in this Court and produce any documents relating to the said property that may be in your possession or power and you are hereby required to take notice, that in default of your appearance, the matter will be disposed of according to law.

Given under my hand and seal of this court this 17 th October 1888

G. S. Khaparde.
Judge.

☞ हें पत्र आकोला येथें के० बा० खंडेराव बाळाजी फडके यांचे "वऱ्हाडसमाचार" छापखान्यांत नारायण खंडेराव फडके यांनीं छापून प्रसिद्ध केलें.